# प्रकरण तीन

## पशुसंवर्धन विभाग

**3.684 60 टक्के अनुदानावर तबेला धारकांना व पशुपालकांना सौर कंदिल, खोडा, खवा मशिन, बादली, किटली व घमेले वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 18,86,948/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्रक्र.82/भाग-III/उदयोग-4/ दिनांक 30/10/2015 नुसार 15 फेब्रुवारी पूर्वी खरेदी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असतांना पशुसंवर्धन विभागाने माहे मार्च 2016 मध्ये खरेदी प्रक्रिया केलेली आहे. म्हणजेच पशुसंवर्धन विभागाने उपरोक्त शासन निर्णयाचे पालन केलेले नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे 15 मार्च नंतर देयके मंजूर करता येणार नाहीत. असे असतांना पशुसंवर्धन विभागाची वरील देयके दिनांक 31/03/2016 रोजी मंजूर करण्यात आलेली आहेत.

3) साठा रजिस्टर नमुना नंबर 33 ला चलन क्रमांक व दिनांक नमुद करुन त्याप्रमाणे किती साहित्य सुस्थितीत प्राप्त झाले व त्यापैकी कोणत्या तारखेला किती साहित्य कोणाला वाटप केले? याच्या परिपूर्ण नोंदी नाहीत. तसेच साहित्य देणाऱ्या व साहित्य प्राप्त झालेल्या संदर्भात अधिकाऱ्याच्या सहया नाहीत. साठा रजिस्टरमध्ये सर्व तालुक्याची नावे टाकून संच वाटप केल्याचे नमुद आहे. तथापि, साहित्य हस्तांतरीत करतांना साठा रजिस्टरला त्यांच्या फक्त सहया आढळून आल्या असून सदरचे साहित्य हस्तांतरीत करतांना सदरच्या अधिकाऱ्याचे नाव व पदनामासह स्वाक्षरी करुन साठा रजिस्टर अद्यावत ठेवून अनुपालन सादर करावे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास-1008/ प्र.क्र.557/34, दिनांक 05/10/1989 नुसार मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

5) सौर उर्जा कंदिल, खोडा मशिन, खवा मशिन, किटली, बादली, घमेले नोंदणीकृत तबेला धारकांना व पशुपालकांना वाटप करण्यात आले असून सदरचा खर्च करतांना पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांनी ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे परिपत्रक क्रमांक झेडपीए-2004/प्र.क्र.446/वित्त-9/ दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट इ नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना अनुक्रमांक 1 ते 10 मधील बाब व कार्यवाही कालावधीच्या मार्गदर्शक सूचनांचे किंवा वेळापत्रकाचे पालन केलेले नाही किंवा त्याप्रमाणे लाभार्थींना लाभ दिलेला नसल्याचे दिसून येते.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1968, कलम 100 नुसार पहिली अनुसूची मधील बाब क्रमांक 17-घ मध्ये दुग्ध व्यवसाय विकास या सदराखाली सदर योजना राबविल्याचे दिसून येते. परंतु, तबेला धारकांना व पशुपालकांना सौर उर्जा कंदिल, खोडा मशिन, खवा मशिन पुरविल्यामुळे दुग्ध व्यवसायाचा विकास कसा झाला? याबाबत स्पष्टीकरणासह खुलासा करावा.

**3.685 75 टक्के अनुदानावर 2000 देशी जातीच्या कुक्कुट पिल्लांचे संगोपनार्थ मदर युनिट स्थापन करणेबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** 75 टक्के अनुदानावर 2000 देशी जातीच्या कुक्कुट पिल्लांचे संगोपनार्थ मदर युनिट स्थापन करणेसाठी अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे निधी वितरण आदेश क्रमांक 366, दिनांक 22/03/2016 अन्वये 3 गटांना रक्कम रुपये 25,00,000/- एवढा निधी वितरीत केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निधी वितरण आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे सर्व ग्रामसंस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. परंतु, सदर ग्रामसंस्था नोंदणीकृत असलेबाबतची कागदपत्र फाईल सोबत जोडलेली नाहीत.

2) अटी व शर्ती प्रमाणे मदर युनिट स्थापनेनंतरचा व्यवसाय बचत गट / ग्रामसंघाने स्वबळावर किमान 3 वर्षापर्यंत चालविणे बंधनकारक आहे, असे ग्रामसंघाकडून लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे. परंतु, पशुसंवर्धन विभागाने असे लेखी हमीपत्र घेतल्याचे दिसून येत नाही.

3) अटी शर्ती प्रमाणे बचत गट / ग्रामसंघाने रुपये 100/- च्या मुद्रांक पेपरवर बंधपत्र देणे आवश्यक आहे. परंतु, अशा प्रकारचे बंधपत्र फाईल सोबत आढळून आले नाही.

4) एक मदर युनिट पूर्ण किंमत रुपये 6,00,000/- आहे. त्यापैकी जिल्हा परिषद सेस 75 टक्के हिस्सा रक्कम रुपये 4,50,000/- आणि ग्रामसंघाचा 25 टक्के हिस्सा रक्कम रुपये 1,50,000/- याप्रमाणे खर्च करावयाचा आहे. त्यानुसार वरील 3 गट स्तरावर केलेल्या रुपये 25,00,000/- एवढया खर्चाचा अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र फाईल सोबत उपलब्ध झालेले नाहीत.

**3.686 जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना दुभत्या जनावरांच्या (75% अनुदानावर) गटाच्या पुरवठ्याबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर कामावर रक्कम रूपये 99,52,176/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 नुसार मार्गदर्शक अट क्रमांक 5 नुसार तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांचे अर्ज स्विकारून प्राप्त झालेले सर्व अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांचेकडे निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करावे. प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी. परंतु, लेखापरीक्षण कालावधीत अर्जाची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1084/ सी.आर/ 1633, दिनांक 16/09/1995 अन्वये लाभार्थी हिस्स्याची रक्कम वसूल केल्याशिवाय योजना कार्यान्वित करू नये. असे असताना लाभार्थी हिस्सा जिल्हास्तरावर जमा केल्याची माहिती प्राप्त झाली नाही.

3) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी योजना राबविणेसाठी योजनेची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ लाभार्थींना झाल्याची निश्चित पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही. नोंदवही ठेवून दुबार लाभ न झाल्याची सत्यता पटवावी.

4) शासन निर्णय दिनांक 22/11/2011 नुसार लाभार्थी निवड समिती आहे. त्यामध्ये जिल्हा समाजकल्याण अधिकारी सदस्य म्हणून दाखविले आहे. परंतु, लाभार्थी निवड यादीवर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

5) शासन निर्णय अट क्रमांक 6 नुसार प्रत्येक वर्षी जून / जुलै महिन्यात अर्ज मागविणेत यावे. परंतु, अर्ज उशिराने प्राप्त किंवा विलंबाने प्राप्त झालेले आहेत.

6) शासन निर्णय अट क्रमांक 11 नुसार संकरीत गाई / मुऱ्हा व जाफराबादी म्हैशीच्या सुधारीत जाती 10 लिटर दुध उत्पादन असलेल्या तसेच दुसऱ्या / तिसऱ्या बेतातील 15 ते 30 दिवसापूर्वी व्यायलेल्या संकरीत गायी / म्हैशी वाटप करणे आवश्यक आहे. परंतू, याबाबतची अद्यावत माहिती नस्तीसोबत आढळून आली नाही. त्यामुळे उत्पादन स्वरुपाचे गायी / म्हैशी खरेदी झाल्याची निश्चित पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

7) शासन निर्णयाप्रमाणे 30% महिला लाभार्थी निवड करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

8) शासन निर्णय अट क्रमांक 19 पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी 10% जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठांस सादर करावा. परंतू, तशी कार्यवाही झाल्याचे नस्तीवरुन आढळून येत नाही.

शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/1002/प्र.क्र.128 दिनांक 06/06/2008 अन्वये अखर्चित रक्कम रुपये 66,824/- वेळीच समर्पित करणे आवश्यक असताना आजपर्यंत अशी कार्यवाही केलेली नाही. याबाबत खुलासा करावा व अखर्चित रक्कम रुपये 66,824/- शासनास परत करुन भरणा चलनासह अनुपालन दाखवावे.

**3.687 पशुवैद्यकिय संस्थांना औषध पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 763, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 97,960/- खर्च करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय संस्थाना औषध पुरवठा करणे बाबतची नस्ती तपासली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दर करारातील कंपनीकडे मागणी नोंदविताना मागणी नोंदविल्यास सबळ पुरावा अभिलेख्यात ठेवलेला नाही.

2) निविदा दराकडे मागणी डाक पोच देय पत्राद्वारे नोंदविलेला नाही.

3) सदर योजनेंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखान्याकडून आवश्यक औषधांची मागणी घेणे आवश्यक होते. तसेच पशुवैद्यकीय दवाखान्याचे प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात गेल्या तीन वर्षात पशु उपचारासाठी झालेल्या पशुरुग्णांच्या आजारांचा आढावा घेवून लागणाऱ्या औषधांची मागणी करणे अत्यंत आवश्यक होते. परंतु, अशाप्रकारे कोणतेही कार्यवाही केलेली नाही.

4) सदर नस्तीसोबत गटाकडील मागणीची दुय्यम प्रत जोडली आहे. परंतु, सदर प्रतीवर गटाकडील कार्यालयीन जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही.

5) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी गटाकडून आलेल्या औषधांच्या मागणीचा एकत्रित गोषवारा काढलेला नाही.

6) औषधे प्राप्त झाल्याची नोंद नमुना नंबर 33 मध्ये घेण्यात आलेली आहे. परंतु, गटाकडे वाटप केल्याच्या पोच नमुना नंबर 33 वर घेतलेल्या नाहीत. तसेच नोंदवहीत औषधाचा उत्पादन दिनांक व एक्सपायरी दिनांक नमूद केलेला नाही.

7) आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांच्याकडील मार्गदर्शक सूचनानुसार फलश्रुती अहवाल घेतला नाही.

8) दवाखाना स्तरावर शिल्लक असलेली औषधांचा शिल्लक साठा विचारात घेऊन औषधांची मागणी तयार केलेली नाही. त्यामुळे दवाखान्यांच्या मागणीप्रमाणे औषधांचा पुरवठा झाला किंवा कसे? याची खात्री करता आली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 98 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याने साठा नोंदवहीची शिल्लक व भांडारातील शिल्लक यांची पडताळणी करून तशा प्रकारचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतानादेखील त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जीपीआर.1088/सीआर 716/30, दिनांक 26/10/1989 अन्वये वेळेवर औषध खरेदी करून त्याच वर्षी वापरणेचा आदेश असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

11) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मस्त्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2010/प्र.क्र.335/पदुम-4, दिनांक 09/08/2011 नुसार दवाखान्यांचा दर्जा व श्रेणीनुसार औषधे खरेदी करून वाटप करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

12) निविदाकाराकडून पुरवठा झालेल्या औषधांची गुणात्मक आणि संख्यात्मक तपासणी झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत प्राप्त पुरवठ्याची रक्कम अदा करावी, असे निर्देश असतानासुद्धा विभागाने तत्पूर्वीच रक्कम अदा केलेली आहे. वरील सर्व बाबींवरून असे दिसून येते की, शासन निर्णयांचा विचार न करता नियमबाह्यपणे सदर योजनेवर खर्च केलेला आहे.

**3.688 खनिजद्रव्य मिश्रण, फीड सप्लीमेंट व जीवनसत्वांचा पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 15,00,122/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दर करारातील कंपनीकडे मागणी नोंदविताना मागणी नोंदविल्यास सबळ पुरावा अभिलेख्यात ठेवलेला नाही.

2) निविदादाराकडे मागणी डाक पोच देय पत्राद्वारे नोंदविलेला नाही.

3) सदर योजनेंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखान्याकडून आवश्यक खनिजद्रव्य मिश्रण, फीड सप्लीमेंट व जीवनसत्वांची मागणी घेणे आवश्यक होते. तसेच पशुवैद्यकीय दवाखान्याचे प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात गेल्या तीन वर्षात पशु उपचारासाठी झालेल्या पशुरुग्णांच्या आजारांचा आढावा घेवून लागणाऱ्या औषधांची मागणी करणे अत्यंत आवश्यक होते. परंतु, अशाप्रकारे कोणतेही कार्यवाही केलेली नाही.

4) सदर नस्तीसोबत गटाकडील मागणीची दुय्यम प्रत जोडली आहे. परंतु, सदर प्रतीवर गटाकडील कार्यालयीन जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही.

5) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी गटाकडून आलेल्या खनिजद्रव्य मिश्रण, फीड सप्लीमेंट व जीवनसत्वांच्या मागणीचा एकत्रित गोषवारा काढलेला नाही.

6) खनिजद्रव्य मिश्रण, फीड सप्लीमेंट व जीवनसत्वांचा प्राप्त झाल्याची नोंद नमुना नंबर 33 मध्ये घेण्यात आलेली आहे. परंतु, गटाकडे वाटप केल्याच्या पोच नमुना नंबर 33 वर घेतलेल्या नाहीत. तसेच नोंदवहीत औषधाचा उत्पादन दिनांक व एक्सपायरी दिनांक नमूद केलेला नाही.

7) आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांच्याकडील मार्गदर्शक सूचनानुसार फलश्रुती अहवाल घेतला नाही.

8) दवाखाना स्तरावर शिल्लक असलेली खनिजद्रव्य मिश्रण, फीड सप्लीमेंट व जीवनसत्वांचा शिल्लक साठा विचारात घेवून मागणी तयार केलेली नाही. त्यामुळे दवाखान्यांच्या मागणीप्रमाणे पुरवठा झाला किंवा कसे? याची खात्री करता आली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 98 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याने साठा नोंदवहीची शिल्लक व भांडारातील शिल्लक यांची पडताळणी करून तशा प्रकारचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतानादेखील त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जीपीआर.1088/सीआर 716/30, दिनांक 26/10/1989 अन्वये वेळेवर औषध खरेदी करून त्याच वर्षी वापरणेचा आदेश असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

11) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मस्त्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2010/प्र.क्र.335/पदुम-4, दिनांक 09/08/2011 नुसार दवाखान्यांचा दर्जा व श्रेणीनुसार औषधे खरेदी करून वाटप करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

12) सदर योजनेसाठी रूपये 2,100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु, तसे केलेले नाही. त्यामुळे रूपये 2,100/- वसूल करावे.

13) निविदाकाराकडून पुरवठा झालेल्या औषधांची गुणात्मक आणि संख्यात्मक तपासणी झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत प्राप्त पुरवठ्याची रक्कम अदा करावी, असे निर्देश असतानासुद्धा विभागाने तत्पूर्वीच रक्कम अदा केलेली आहे. वरील सर्व बाबींवरून असे दिसून येते की, शासन निर्णयांचा विचार न करता नियमबाह्यपणे सदर योजनेवर खर्च केलेला आहे. त्यामुळे सदर रक्कम रूपये 29,95,744/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

14) पुरवठा आदेशामध्ये सहित्य किती दिवसात पुरवठा करावा, हे नमूद नाही. तसेच उशिराने पुरवठा केल्यास किती टक्के दंड भरवा लागेल? हे नमूद केलेले नाही. साहित्य पुरवठा चलनावर दिनांक नमूद नाही. तसेच साहित्य प्राप्त करून घेणाऱ्या अधिकाऱ्याची दिनांकित स्वाक्षरी नाही. यावरून असे दिसून येते की, विभागाने सबंधित

कंत्राटदाराचे हित जोपासले आहे. तरी याबाबत सखोल चौकशी करून उशिराने प्राप्त झालेल्या वस्तूवर दंडाची रक्कम प्रगणित करून वसूल करावी.

**3.689 गोचिड निर्मूलन योजनेतुन औषधे खरेदी करणे**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 596, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 3,99,997/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) साठा रजिस्टरमध्ये औषधे प्राप्त करतांना स्वाक्ष-या केलेल्या आहेत. परंतु, दिनांक नमुद करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर औषधे विहीत मुदतीत वाटप झालेबाबत पडताळणी करता आली नाही. त्याबाबत खुलासा करावा.

2) पंचायत समितीच्या गटाने गोचिड औषधे संदर्भात मागणी नोंदवली होती किंवा कसे? याबाबत पडताळणी करता आली नाही. त्याबाबत खुलासा करावा.

3) उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आलेली नाहीत. सदर औषध विनियोग झालेबाबत पडताळणी करता आली तरी उपयोगिता प्रमाणपत्र घेऊन पुर्तता करावी.

4) गुणात्मक अहवाल घेण्यात आलेला नाही. वरील औषधे चांगल्या दर्जाची असलेबाबत अहवाल घेतलेबाबत कागदपत्रे घेतेली किंवा कसे? याबाबत खुलासा करावा व पुर्तता अनुपालन सादर करावे.

**3.690 चिकन, मटण स्टॉलधारकांना डिपफ्रीजर वाटप करणे. (90 टक्के अनुदानावर)**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,50,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनाम्यात अटी व शर्ती नोंद नाहीत. तसेच, करारनाम्यावर साक्षीदार सही, करारनामा दिनांक नोंद नाही.

2) लाभार्थी निवड यादी नाही. तसेच लाभार्थ्यांनी त्याच त्या वर्षी रक्कम भरणा केल्याची चलने व पशुसंवर्धन विभागाकडील जमेबाबतची पावती सादर करावी.

3) 90 टक्के अनुदानाने लाभार्थ्यांना लाभ देण्याचे आहे. तथापि, लाभ देण्यापूर्वी लाभार्थ्याने 10 टक्के रक्कम भरणा केल्याची चलने सादर करावीत.

4) लाभार्थ्याच्या नावे जागा असल्याची 7/12 किंवा बक्षिसपत्र सादर करावे. तसेच सदर डीपफ्रिजरची एम.आर.पी दर नेमके किती आहेत, याची नोंद नाही. एम.आर.पी पेक्षा कमी दराने खरेदी केल्याची खात्री पटवावी. तसेच सदर डिपफ्रिजरचा योग्य विनियोग होत असल्याचे व योजनेचा उद्देश साध्य होत असल्याबाबत विनियोग प्रमाणपत्र सादर करावे. तसेच संबंधीत लाभार्थी हे स्टॉलवर स्वच्छता व निर्जंतुकरण केल्याचा अहवाल नाही. तो सादर करण्यात यावा.

5) नमुना नंबर 33 साठा नोंदवहीनुसार 8 तालुक्यांना एकूण 16 नग लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहेत. तथापि, वाटप पोहोच नाहीत. त्या सादर कराव्यात.

6) श्री.जितेंद्र मधुकर नाडे, तालुका संगमेश्वर व श्री.महमंद सिराज काझी तालुका लांजा यांचे फक्त प्रत्येकी रूपये 2,400/- भरणा केल्याचे चलन आहे. उर्वरित लाभार्थ्यांचे 10 टक्के लाभार्थी हिस्सा भरणा केल्याची चलने सादर करावीत.

**3.691 जिल्हा परिषद वाढीव उपकराव्यतिरिक्त अनुदानामधून अनुदानावर दुधाळ जनावरांचा पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 360 दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 80,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमूद एकूण 18 लाभार्थींचे फक्त अर्ज आहेत. इतर कोणतेही कागदपत्र नाहीत. याचा अर्थ 18 लाभार्थींचे जनावर खरेदी लेखापरीक्षण कालावधीपर्यंत झालेली नाही.

2)योजना अट क्रमांक 19 नुसार लाभार्थीने विहित नमुन्यातील करारनामा करून देणे आवश्यक आहे. परंतु, 03 लाभार्थ्यांचे करारनामे नाहीत. तसेच 03 लाभार्थीचे करारनाम्यावर सही नाही.

3) योजना अट क्रमांक 15 नुसार जनावरांची खरेदी जिल्हाबाहेरून लाभार्थीच्या पसंतीने खरेदी समिती समक्ष करणे आवश्यक आहे. 7 लाभार्थ्यांचा खरेदी समिती सदस्य दाखला नाही.

4) उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ओरोस यांना 191 लाभार्थींचा धनादेश रक्कम रूपये 76,40,000/- वर्ग केला आहे. परंतु, धनादेशासोबत दिलेली 191 लाभार्थींची यादी उपलब्ध झाली नाही. सदर बँकेची पोहोच असलेली 191 लाभार्थी यादी लेखापरीक्षणास सादर करावी.

### 3.692 जिल्हा परिषद वाढीव उपकराव्यतिरिक्त अनुदानामधून 90 टक्के अनुदानावर स्टीलची किटली, घमेले व फावडे यांचा पुरवठा करणे.

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 4,19,976/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशात वस्तू कधीपर्यंत पोहोच करावयाच्या याची मुदत नोंद नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/ प्र.क्र.82/ भाग-3/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 3.2.3 नुसार दरपत्रकाच्या आधारे खरेदी करताना VAT/CST क्रमांक असलेल्या व सदर क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या निविदाकाराच्या लेटर हेडवर दरपत्रक घेणे आवश्यक आहे. पुरवठा आदेश दिलेल्या समृद्धी फॅमिली शॉपीच्या दरपत्रकावर VAT/CST क्रमांक नमूद नाही.

3) समृद्धी फॅमिली शॉपीच्या दरपत्रकावर व साहित्य पावतीवर विजयश्री ॲग्रो सर्व्हिस सेंटरचे VAT रजिस्ट्रेशन नमूद आहे. याबाबत खुलासा करावा.

4) सदर साहित्य वाटप केल्याबाबत कुडाळ तालुका 84 लाभार्थी वस्तू पोहोच यादी आहे. उर्वरित तालुके वैभववाडी 11, देवगड 66, कणकवली 60, मालवण 23, वेंगुर्ले 18, सावंतवाडी 39 व दोडामार्ग 6 याप्रमाणे लाभार्थी वस्तू पोहोच यादी लेखापरीक्षणास सादर करावी.

### 3.693 पशु वैद्यकीय दवाखान्यांना फर्निचर पुरविणे योजनेतील अनियमितता.

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादाराला फर्निचर पुरवठा करण्यासाठी दिलेल्या पुरवठा आदेशात वस्तू पुरवठा करण्याची मुदत नमूद करण्यात आलेली नाही.

2) वस्तू सुस्थितीत पोचलेबाबत कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार एखाद्या वस्तूची तुटक खरेदी न करता एकाचवेळी करावयाची असताना सदर विभागाकडून फर्निचर खरेदी तुटक स्वरुपात करण्यात आलेली दिसून येते.

4) प्राप्त झालेल्या वस्तूचे वाटप केल्याबाबत साठा नोंदवहीला पोच घेण्यात आलेली नाही.

5) सदर योजनेच्या सादर केलेल्या टिपणीनुसार दवाखान्याचे मागणी पत्र घेवून वस्तू पुरवठा करणे आवश्यक होते. परंतु, पंजीकेसोबत दवाखान्याच्या केलेल्या मागणीबाबत कागदपत्रे दिसून आलेली नाही.

6) सदर वस्तू दवाखान्याला पोचल्याबाबत त्यांच्या साठा नोंदवहीच्या छायांकित प्रती पंजीकेसोबत जोडण्यात आलेल्या नाहीत.

**3.694 बिगर आदिवासी योजनांतर्गत कामधेनू ग्रामदत्तक योजनांतर्गत औषध खरेदीतील तसेच इतर अनियमितता.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 16,99,341/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सयाव्यावसाय विभागाकडील शासन निर्णय क्रमांक डिआयएस-2009/प्र.क्र.435/पदुम-4, दिनांक 05/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 13 नुसार गुणवत्ता तपासणी करुन त्याची खात्री करुन लेखी पुरावा संग्रही ठेवून त्यानंतरच देयकाची अदायगी करावी, असे स्पष्ट आदेश आहेत. तथापि, अनुक्रमांक 2 Acid Phosphate Liquid -batch no. SSL 41 ची गुणवत्ता चाचणी analysis report no. A520/016/16, दिनांक 24/04/2016 रोजी केलेली असतांना, देयक त्या अगोदरच पारीत केलेले आहे. तसेच अनुक्रमांक 3 च्या औषधांची गुणवत्ता तपासणी केलेबाबतचे पुरावे नस्तीसोबत दिसून येत नाही. तरी उपरोक्त अनुक्रमांक 2 व 3 समोर नमुद औषधांची गुणवत्ता तपासणी अहवाल नसतांना देयके पारीत करण्याचे प्रयोजनाबाबत खुलासा करावा.

2) वैरण विकास बाबींवर महाराष्ट्र राज्य महाबिज बियाणे महामंडळ यांचेकडून मका बियाणे खरेदी करण्यात आलेले आहे. परंतु, सदरचे बियाणे कामधेनू दत्तक योजनांर्तगत लाभार्थींना वाटप करतांना लाभार्थीकडे शेत जमिन असून ती बागाईत असून त्याचा वापर पशु खाद्यासाठी वैरण विकासासाठीच वापर झालेबाबत लाभार्थींचे अर्ज व त्यासोबत आवश्यक ती 7/12 उतारे इत्यादी लेखापरीक्षणात पडताळणीस उपलब्ध करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर योजना अनुदानाचा विनियोग सफल झाला किंवा कसे? याबाबत खात्री करता आली नाही. सदर बाबींवरील खर्चाची सत्यता पडताळणी करणेकामी अभिलेखे उपलब्ध करुन खात्री पटवावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम 98 आणि हॉस्पीटल मॅन्युअल खंड-1 चाप्टर-26 परिच्छेद-18 प्रमाणे सक्षम अधिकारी हे साठा नोंदवहीतील शिल्लक परिमाण व भांडारातील प्रत्यक्ष परिमाण यांची नियमितपणे पडताळणी करुन तत्संबंधित साठा नोंदवहीत प्रमाणपत्र देतील. त्याखेरीज सक्षम अधिकारी हे आपल्या अधिनस्त दवाखान्यांच्या भेटीत चाचणी पडताळणी करुन तसा अभिप्राय नोंदवतील. तथापि, अशा प्रकारे साठा पडताळणी केल्याचे साठा नोंदवही पडताळणीस आढळून आलेले नाही.

4) शासन निर्णय ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र.मागास-1089/प्र.क्र.41/ 34, दिनांक 14/09/1989 मधील परिच्छेद 6 नुसार ज्या योजनेस शासन अनुदान प्राप्त होते. त्या योजनेवर जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नातुन खर्च करणे उचित नसतांना खर्च करण्यात आलेला आहे.

5) सदर औषध साहित्याचे मागणीपत्र तालुकास्तरावरुन प्राप्त करण्यात आलेली आहे. परंतु, सदर मागणी पत्राची तपासणी केली असता एकाच प्रकारची मागणीपत्रक तालुकास्तरावरुन प्राप्त झालेली आहेत. एकही तालुकास्तरावर इतर बाबींचे/साहित्याचे मागणीपत्रात अनुक्रमांक औषधाचे नावात भिन्नता दिसून येत नाही. एकाच मागणीपत्रकाची झेरॉक्स प्रत इतर औषध खरेदी करण्यास वापरण्यात आलेली आहे. यावरुन पुर्व नियोजित मागणीपत्र घेण्यात आलेली दिसून येते.

6) औषधाचा विनियोग दाखला व उपयोगीता प्रमाणपत्र जिल्हा परिषदेस सादर करण्यात आलेली आहेत. परंतु, सदर योजनेचा फलश्रुती अहवाल दिसून येत नाही.

7) पशुधन मंडळ स्थापन करण्यात येवून सदर मंडळाचे मासिक तसेच वार्षिक दुग्ध व्यवसायात वाढ/घट बाबत प्रगती अहवाल उपलब्ध करण्यात यावा.

**3.695 जिल्हा परिषद सेस निधीतून गोचिड व गोमाशा निर्मुलनासाठी औषधे खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचे सन-2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात जिल्हा परिषद सेस निधीतून पशुसंवर्धन विभागासाठी गोचीड, गोमाशा निर्मुलनासाठी खरेदी करणेकामी रुपये 8,99,966/- खर्च करण्यास विषय समितीत मंजूरी देण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरचे साहित्य साठा नोदंवही नमुना नंबर 33 मध्ये जमा पोटी घेण्यात आलेली आहे. परंतु, वाटपाचा दिनांक नमुद केलेला नाही.

2) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सयव्यवसाय विभागाकडील शासन निर्णय क्रमांक डिआयएस-2009/प्र.क्र.435/पदुम-4, दिनांक 05/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 13 नुसार गुणवत्ता तपासणी करुन त्याची खात्री करुन लेखी पुरावा संग्रही ठेवून त्यानंतरच देयकाची अदायगी करावी, असे स्पष्ट आदेश असतांना तशी गुणवत्ता तपासणी केलेबाबतचे पुरावे नस्तीसोबत दिसून येत नाही. तरी सदरचे गुणवत्ता तपासणी अहवाल नसतांना देयके पारीत करण्याचे प्रयोजनाबाबत खुलासा करावा. तसेच उपरोक्त नमुद औषधांची दिनांक 26/11/2008 च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 12 नुसार औषध मागणी अधिका-यांनी प्राप्त औषधांची गुणात्मक तपासणी आयुक्त पशुसंवर्धन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून करुनच गुणवत्ता पात्र असलेल्या औषधांचीच अदागी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत खरेदी प्रकरणी पुरवठादारांनी त्यांचे चाचणी अहवाल सादर केलेले असले तरी मागणी अधिकारी यांनी त्रयस्थ पार्टीचे चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक होते.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम 98 आणि हॉस्पीटल मॅन्युअल खंड-1 चाप्टर-26 परिच्छेद-18 प्रमाणे सक्षम अधिकारी हे साठा नोंदवहीतील शिल्लक परिमाण व भांडारातील प्रत्यक्ष परिमाण यांची नियमितपणे पडताळणी करुन तत्संबंधित साठा नोंदवहीत प्रमाणपत्र देतील त्याखेरीज सक्षम अधिकारी हे आपल्या अधिनस्त दवाखान्यांच्या भेटीत चाचणी पडताळणी करुन तसा अभिप्राय नोंदवतील. तथापि, अशा प्रकारे साठा पडताळणी केल्याचे साठा नोंदवही पडताळणीस आढळून आलेले नाही.

4) शासन निर्णय ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.41/ 34, दिनांक 14/09/1989 मधील परिच्छेद 6 नुसार ज्या योजनेस शासन अनुदान प्राप्त होते, त्या योजनेवर जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नातुन खर्च करणे उचित नसतांना खर्च करण्यात आलेला आहे.

5) सदर औषध साहित्याचे मागणीपत्र तालुकास्तरावरुन प्राप्त करण्यात आलेली आहे. परंतु, सदर मागणी पत्राची तपासणी केली असता एकाच प्रकारची मागणीपत्रक तालुकास्तरावरुन प्राप्त झालेली आहेत. एकही तालुकास्तरावर इतर बाबींचे/साहित्याचे मागणीपत्रात अनुक्रमांक औषधाचे नावात भिन्नता दिसून येत नाही. एकाच मागणीपत्रकाची झेरॉक्स प्रत इतर औषध खरेदी करण्यास वापरण्यात आलेली आहे. यावरुन पुर्व नियोजित मागणीपत्र घेण्यात आलेली दिसून येते.

6) औषधाचा विनियोग दाखला व उपयोगीता प्रमाणपत्र जिल्हा परिषदेस सादर करण्यात आलेली आहेत. परंतु, सदर योजनेचा फलश्रुती अहवाल दिसून येत नाही.

### 3.696 कामधेनु दत्तक ग्रामयोजनेतील अनियमितता (2015-16)

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** कामधेनु दत्तक ग्राम योजना सन 2015-2016 अंतर्गत विभागाने एकुण 16 गावांची निवड केली असुन पडताळणीअंती खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

शासन निर्णय पशु/नापुयो 2010/ प्र.क्र.150/ पदुम-1, दिनांक 29/10/2010 मधील अटक्रमांक 2 नुसार योजनेची अंमलबंजावणीसाठी जंतुनाशके पाजणे, गोचिड गोमाश्या निर्मुलन, रोगप्रतिकारक लसीकरण वंधत्वनिवारण शिबीर याबाबीसाठी माहे मे महिन्यातीन पुर्वनियोजीत दिनांकास लसीकरण व शिबीरे यांचे आयोजन करणे आवश्यक आहे. तथापि, सदर कार्यक्रम कोणत्या दिनांकास राबविले गेले? याचा तपशील नस्तीत नाही. तथापि, माहे मार्च 2016 मधील खरेदीन्वये योजना विलंबाने राबविण्यात आलेली आहे.

### 3.697 रुग्णालये व दवाखाने यांना औषध पुरवठा करणे.

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत 10 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 36,77,465/- खर्च करण्यात आला आहे. सदर खर्चाबाबत नस्ती, पुरवठा, दरकरार, पुरवठा आदेश, साठा नोंदवही इत्यादी अभिलेख्यांची पडताळणी करुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक डिआयएस-102003/13592/प्र.क्र.188/पदुम-4, दिनांक 26/11/2008 अन्वये औषधांची विहित केलेल्या टक्केवारी प्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु साठा नोंदवहीत वर्गवारी प्रमाणे नोंदी केलेल्या नसल्याने नमुद शासन निर्णयातील टक्केवारी नुसार खरेदी करण्यात आल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

2) टिपणी पान क्रमांक 1 अन्वये सदरची खरेदी पावसाळयापुर्वी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. तालुका स्तरावर पुरवठा दिनांक 01/06/2016 रोजी केल्याने सदर योजनेचा उद्देश सफल झालेला नाही. सदरचा पुरवठा विलंबाने केलबाबतचा खुलासा सादर करणेत यावा.

3) पुरवठादारांबरोबर आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केलेल्या दरकरारानुसार औषधे खरेदी करण्यात आली आहेत. परंतु पशुवैद्यकीय दवाखाने उपकेंद्र यांनी सादर केलेल्या मागणी पत्रांचा गोषवारा नस्तीसोबत जोडण्यात आलेला नाही. तरी मागणी पत्राकानुसार केलेली खरेदी योग्य असल्याचे अनुपालन सादर करावे.

4) वर नमुद केलेप्रमाणे साठा नोंदवहीत दिनांक 15/03/2016 ते 26/03/2016 रोजी सदर औषधे पशुसंवर्धन विभागास प्राप्त झाल्याचे नमुद आहे. सदर औषधांचे वाटप तालुका स्तरावर दिनांक 01/06/2016 या कालावधीत करण्यात आलेला आहे. सदर औषधांचे विभाग स्तरावरुन विलंबाने वाटप केल्याबाबत खुलासा करण्यात यावा.

5) उपरोक्त नमुद दिनांक 26/11/2008 च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 12 नुसार औषध मागणी अधिका-यांनी प्राप्त औषधांची गुणात्मक तपासणी आयुक्त पशुसंवर्धन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतुन करुनच गुणवत्ता पात्रता असलेल्या औषधांचीच अदागी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत खरेदी प्रकरणी पुरवठादारांनी त्यांचे चाचणी अहवाल सादर केलेले असले तरी मागणी अधिकारी यांनी त्रयस्थ पार्टीचे चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक होते. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने प्राप्त औषधांच्या गुणात्मकतेची लेखापरीक्षणास अभिलेख्याद्वारे खात्री पटलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 98 आणि हॉस्पीटल मॅन्युअल खंड 1 चाप्टर 26 परिच्छेद 18 प्रमाणे सक्षम अधिकारी हे साठा नोंदवहीतील शिल्लक परिमाण व भांडारातील प्रत्यक्ष परिमाण यांची नियमितपणे पडताळणी करुन ततसंबंधीत साठा नोंदवहीत प्रमाणपत्रा देतील त्याखेरीज सक्षम अधिकारी हे आपल्या अधिनस्त दवाखान्यांच्या भेटीत चाचणी पडताळणी करुन तसा अभिप्राय नोंदवतील. तथापि अशा प्रकारे साठा पडताळणी केल्याचे साठा नोंदवही पडताळणीस आढळुन आलेले नाही.

7) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.41/34, दिनांक 14/09/1989 मधील परिच्छेद 6 नुसार ज्या योजनेस शासन अनुदान प्राप्त होते त्या योजनेवर जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पनातुन खर्च करणे उचित नसतांना खर्च करण्यात आलेला आहे.

**3.698 जिल्हा वार्षीक योजना बिगर आदीवासी योजनेअंतर्गत कोल्ड कॅबीनेट व्हर्टीकल खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा वार्षिक योजना बिगर आदीवासी योजनेअंतर्गत पशुवैदयकीय दवाखान्यांचे प्रथमोपचार केंद्रांचे बांधकामे करणे या योजनेअंतर्गत सन 2014-2015 या वर्षातील अखर्चीत रक्कमेतून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयांचे बळकटीकरण करणेबाबत पशुवैदयकीय संस्था / दवाखाने यांना हत्यारे /औजारे व उपकरणे पुरवठा / खरेदी करणेबाबत दिनांक 14/01/2016 च्या कार्यालयीन टिपणीत नमूद केलेले असून त्याप्रमाणे पशुवैदयकीय दवाखान्याचे प्रथमोपचार केंद्राचे बांधकाम करणे या योजनेअंतर्गत रुपये 5 कोटीची मंजूर तरतूद आहे. दिनांक 30/08/2010 च्या शासननिर्णयातील निर्णय क्रमांक 16 नुसार जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत एकुण प्राप्त निधीच्या 10 टक्के रक्कम प्रशासकीय कार्यालयाचे बळकटीकरणासाठी वापरणेचे नमूद आहे. त्याअनुषंगाने पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी सन 2015-2016 मध्ये कोर्ड कॅबीनेट व्हर्टीकल चे 26 नगांची प्रमाणक क्रमांक 963, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 48,62,000/- ची खरेदी करणेत आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) कोल्ड कॅबीनेट व्हर्टीकल विहीत मानके व मापदंडाप्रमाणे असलेची खात्री करणे आवश्यक असताना दिनांक 18/03/2016 रोजीच्या कोल्ड कॅबीनेट व्हर्टीकल च्या डिलीव्हरी चलनानुसार 26 नगांचा पुरवठा प्राप्त करतेवेळी सदर साहीत्याची पडताळणी व स्वीकृतीबाबत संबंधीतांची स्वाक्षरी दिनांकीत नसलेने साहीत्याचा प्रत्यक्ष पुरवठा व विहीत मानके व मापदंड गुणवत्ता इत्यादींबाबत अधिकृतता पडताळून पाहीले किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

2) भावबंद करारातील शेडयूल अ मधील स्पेसीफीकेशन व सूचना क्रमांक 7 प्रमाणे कोल्ड कॅबीनेट व्हर्टीकल बाबत साहीत्याची विहीत मानके व मापदंड दर्जा इत्यादी अंतर्भूत केलेले आहे. त्यानुसार पुरवठा दाराने copper coil purity certificate हे NABL Accredited Laboratory कडून प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तसेच compressor warranty ही तीन वर्षाची असणे आवश्यक आहे. तसेच Storage temparature बाबत परीपुर्ण गुणवत्ता असणे इत्यादी बाबींचा अंतर्भाव लक्षात घेवून कोल्ड कॅबीनेट व्हर्टीकल असावे, असे नमूद असून त्याप्रमाणे सदर बाबींची कागदोपत्री तसेच योग्य ती प्रमाणपत्रे घेवून खात्री करुनच पुरवठाधारकास पुरवठा आदेश दिलेचे अधिकृतता लेखापरीक्षणात पडताळून पाहता आली नाही. तसेच वरील कागदपत्रे व प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास मिळाली नाही.

3) भावबंद दरकरारातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 10 नुसार पुरवठा संदर्भात कोणतीही तक्रार असलेस संबंधीत पुरवठाधारकास दिनांक 30/09/2016 पर्यंत तक्रार कळविणेचे नमूद केलेले आहे. तसेच सदर भावबंद दरकरारातील सुचना क्रमांक 13 नुसार पुरवठाधारकाकडून उपकरणे साहीत्य यांची गुणात्मक व संख्यात्मक तपासणी झालेनंतर 45 दिवसांत पुरवठादाराची देयक अदा करणे बाबत नमूद केलेले आहे. तथापि, विभागाने गुणात्मक व संख्यात्मक तपासणी शासकीय / निमशासकीय, खाजगी प्रयोगशाळांकडूनही साहित्याच्या चाचण्या करुन घ्याव्यात. परंतू, शासकीय / निमशासकीय प्रयोगशाळांकडून साहित्याच्या चाचण्या करुन घेण्यात आलेल्या नाही. सदर प्रकारचे चाचणी अहवाल प्राप्त न करताच दिनांक 31/03/2016 रोजी देयक पारीत केलेले आहे.

4) विभागाने साठा नोंदवहीत कोल्ड कॅबीनेट व्हर्टीकलचे वाटप केलेले आहे. त्यात राहाता तालुकयातील अधीकारी / कर्मचारी यांनी कोल्ड कॅबीनेट व्हर्टीकल मिळालेबाबत स्वाक्षरी केलेली नाही.

**3.699 कामधेनू दत्तक योजना अंतर्गत (बिगर आदीवासी) औषध पुरवठा खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 59,16,226/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भावबंद दरकरारातील सुचना क्रमांक 14 प्रमाणे जिल्हास्तरीय औषध मागणी करणा-या अधिकाऱ्यांनी औषधांची मागणी करण्यापूर्वी त्यांच्या अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखान्यांकडून आवश्यक औषधींची मागणीपत्रके घेणे आवश्यक आहे. तसेच सदर पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात 3 वर्षात पशु उपचारासाठी झालेल्या पशुरुग्णांचा आजारांचा आढावा घेवून लागणा-या औषधांची मागणी करावी, अशी दर करारात सूचना असताना देखील संबंधीत नस्ती व देयकासोबत अधिनस्त दवाखान्यांचे तपशीलवार मागणी पत्र नस्तीमध्ये आढळून आलेले नाही.

2) संबंधीत विभागाला औषधी कोणत्या दिनांकाला प्राप्त झाली. तसेच साठा नोंदवहीत पंचायत समिती स्तरावरील पशुवैद्यकीय दवाखान्यांना कधी वाटप करणेत आले? याबाबत अधिकारी कर्मचारी यांच्या दिनांकीत नोंद घेतलेली नाही.

3) औषधांबाबतचे विनीयोग व उपयोगीता प्रमाणपत्रे पशुवैद्यकीय दवाखानेनिहाय उपलब्ध झालेले नाही.

**3.700 अनुसुचित जाती नवबौद्ध लाभार्थींना 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर कामावर रक्कम रूपये 3,07,61,989/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 ची अखर्चित रक्कम रूपये 1,07,61,989/- सन 2015-2016 मध्ये करण्यासाठी जावक क्रमांक जि.प./प.स.लेखा/325, दिनांक 14/08/2016 अन्वये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा

परिषद पुणे यांनी मान्यता दिली आहे. सदर लेखाशीर्षावर सन 2015-2016 मध्ये 200 लक्ष अनुदान प्राप्त झाले. त्यानुसार 13 तालुक्यांना रूपये 1,99,68,148/- अनुदान तालुका स्तरावर वाटप करण्यात आले आहे. नस्तीस जोडलेल्या तालुक्यांच्या विनियोग दाखल्यावरून रक्कम रूपये 31,852/- इतकी रक्कम शिल्लक असल्याचे दिसते. सदर शिल्लक रक्कम खर्च करण्यात आली नसल्याने रक्कम रूपये 3,01,295/- शासन खाती भरणा करावी.

2) सन 2015-2016 मध्ये एकूण 313 लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाकडील शासन निर्णय क्रमांक जिवायो-211/प्रक्र.पदुम 4, दिनांक 22/11/2011 मधील अट क्रमांक 3 नुसार 30 टक्के म्हणजेच 93 महिला लाभार्थी निवडणे आवश्यक असताना फक्त 74 महिला लाभार्थी निवडले आहेत. त्यामुळे 19 महिला लाभार्थींना लाभापासून वंचित राहावे लागले आहे.

3) सदर शासन निर्णयातील अट क्रमांक 4 नुसार 3 टक्के अपंग म्हणजे 9 लाभार्थी यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही.

4) सदर योजनेचा लाभार्थी हिस्सा वसुल केलेली एकत्रित रक्कम, शासन अनुदान व लाभार्थी हिस्सा असा एकूण ज्या विक्रेत्याकडून जनावर खरेदी केले, त्याला रक्कम अदा केलेची कृषी उत्पन्न बाजार समितीची पावती नाही.

5) सदर शासन निर्णयातील अट क्रमांक 15 नुसार योजनेच्या अंमलबजावणीचे मासिक, त्रैमासिक, वार्षिक व फलनिष्पत्ती अहवाल खात्यास सादर करावा, असे नमूद असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

6) सदर शासन निर्णयातील अट क्रमांक 18 नुसार सन **201**5-**201**6 मध्ये वितरीत निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे पुढील आर्थिक वर्षाच्या एप्रिल महिन्यात सादर करणे बंधनकारक असताना उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त झालेली नाहीत.

**3.701 जनावरांना औषधे पुरवठ्यामधील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रूपये 20,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक डीआयएस 2009/प्र.क्र.435/पदुम-4, दिनांक 05/03/2010 मधील अट क्रमांक 13 अन्वये औषधे मागणी अधिकाऱ्यांनी प्राप्त औषधाची गुणात्मक तपासणी मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

2) अभिप्राय क्रमांक 1 मध्ये नमुद शासन निर्णय दिनांक 05/03/2010 मधील अट क्र.22 नुसार पशुवैद्यकीय संस्थाना पुरवठा केलेल्या औषधाचा ती वापरल्याचा तिमाही अहवाल घेण्यात यावा असे असताना अहवाल घेतल्याचे दिसून आले नाही.

3) नस्तीस पुरवठादाराचे डिलिव्हरी चलन जोडलेले नसल्याने औषधे पशुवैद्यकीय संस्थाना वेळेत प्राप्त झाले याची खात्री करता आली नाही.

4) पशुवैद्यकीय संस्थानी उपयोगीता प्रमाणपत्र सादर केले नाही.

5) तालुकानिहाय औषधे साठा नोंदवही व मास्टर नोंदवही उपलब्ध न केल्याने नोदी घेतल्याचे दिसून आले नाही.

**3.702 50 टक्के अनुदानावर सर्वसाधारण लाभार्थ्यांस 2 एचपी कडबाकुट्टी संयंत्र पुरविणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 66, दिनांक 12/02/2016 अन्वये रक्कम रुपये 19,93,050/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2006 मधील परिशिष्ट “इ” नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्याबाबत मार्गदर्शक सुचना आहेत. त्यानुसार विभागाने कार्यवाही करतांना प्रत्येक टप्प्यावर विलंब केला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय पंरास/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1988 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबवतांना लाभार्थी हिस्सा रक्कम प्रथम वसुल करुन खरेदी करणे आवश्यक आहे, असे असतांना सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही केलेली नाही. पुरवठा आदेश दिनांक 01/11/2015 ला दिला आहे व लाभार्थी हिस्सा खालीलप्रमाणे वसुल केला आहे. उदा. पंचायत समिती, वाई दिनांक 26/04/2016, पंचायत समिती, सातारा दिनांक 25/04/2016, पंचायत समिती, खंडाळा दिनांक 17/03/2016, पंचायत समिती, महाबळेश्वर दिनांक 19/01/2016.

3) आयकर अधिनियम 1961 मधील नियम क्रमांक 194 सी नुसार पुरवठादाराकडून 2 टक्के आयकर वसुल करणे आवश्यक असतांना कृषी इंडस्ट्रीज कसबा, सांगावा, कागल, कोल्हापूर यांच्या रक्कम रुपये 19,93,050/- चे देयकातून आयकर कपात केलेला नाही. सदर नियमानुसार रक्कम रुपये 39,861/- वसुल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

4) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 2 नसार पुरवठा आदेश दिल्यानंतर 45 दिवसांचे आत साहित्य पोच करणे बंधनकारक असून विलंबाने पुरवठा केल्यास नियमाप्रमाणे दंडाची आकारणी अनुदानाच्या देयकातून वसूल केली जाईल.

पंचायत समिती फलटण व पंचायत समिती खंडाळा यांना विलंबाने साहित्य पुरवठा केला असल्याने रूपये 8,266/- विलंब आकार वसूल होणे आवश्यक आहे.

5) डिलेव्हरी चलनावर पंचायत समिती खंडाळा व फलटण वगळता नऊ पंचायत समितींच्या दिनांकित पोच नाहीत.

### 3.703 यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीबाबत.

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत 7 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 13,88,655/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खर्चास प्रशासकीय घेतलेबाबत आदेश नस्तीसोबत आढळले नाहीत.

2) सदर साहित्य खरेदीकरिता जिल्हा परिषदेने दिलेले पुरवठा आदेश जावक क्रमांक व दिनांकित नाहीत.

3) उपरोक्त प्रमाणक क्रमांक 472, 473 व 474 दिनांक 31/03/2016 अन्वये खर्ची टाकलेल्या प्रमाणकासोबत उपप्रमाणक अनुक्रमे डिलिवरी चलन नंबर 004/16-17, डिलिवरी चलन नं 005/16-17 व डिलिवरी चलन नं 003/16-17 दिनांक 16/04/2016 आहे. परंतु साठा नोंदवहीत अनुक्रमे पान नंबर 92, पान नंबर 90 व पान नंबर 91 वर सदर साहित्य प्राप्त झाल्याची नोंद दिनांक 29/03/2016 रोजी नोंदीवलेली आहे. मात्र तालुकास्तरावर वाटपादाखल पोहोच स्वाक्षरी पाहता, साठा नोंदवहीला दिनांक 08/04/2016 रोजी वाटप नोंदलेले आहे. उपरोक्त अनियमिततेबाबत लेखापरीक्षणास पूर्तता दाखवावी.

4) पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे कडील क्रमांक व्हीईटी/टेंडर/326/16/2014-16/पसं-12, दिनांक 04/01/2016 अन्वये दरकरार मंजूरीचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यामध्ये उपरोक्त पुरवठा दारांपैकी मे.Lab Enterprises Mumbai पुरवठादाराचा समावेश दिसून येत नाही. सदर दरकरारातील अट क्रमांक 5 नुसार दर हे सर्व करांसहीत असून पुरवठादाराने पुरवठा थेट तालुक्यापर्यंत करण्यासाठी आहेत. मात्र सोबतची चलने व मालसाठा नोंदीनुसार जिल्हा स्तरावर पुरवठा केला असून नंतर पशुवैद्यकिय दवाखान्यांनी नेली आहेत. यामुळे कालापव्यय व वाहतुकीचा नाहक खर्च झाला आहे.

5) उपरोक्त दरकरार मंजूरी आदेशातील अट क्रमांक 13 नुसार पुरवठा झालेल्या साहित्याची संख्यात्मक तपासणी करावी असे नमूद आहे. तथापि, अशी तपासणी केली नसलेने योग्य दर्जाची व योग्य संख्येने साहित्य प्राप्त झाली असलेबाबत खात्री होत नाही.

दरकरार मंजुर आदेश अट क्रमांक 15 नुसार जिल्हास्तरीय अधिका-यांनी खरेदी केलेले साहित्य विनावापर पडून राहिल्यास व मुदतबाहय झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मागणी अधिकारयाची आहे. उपरोक्त नोंदींचे साठा रजिस्टर पाहता खरेदी सन 2015-2016 मधील असून वाटप पुढील वर्षात सन 2016-17 मध्ये झाल्याचे दिसून येते.

**3.704 कुक्कुटपालन संस्थांकडील कर्ज थकबाकीबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** पशुसंवर्धन विभागामार्फत शासन निर्णय क्रमांक कुक्कुट-10-2001/प्र.क्र.448/पदुम, दिनांक 02/12/2012 अन्वये खालील संस्थांना दिलेल्या कर्जापैकी दिनांक 31/03/2014 अखेर कर्ज व व्याज थकीत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त विवरणपत्रानुसार मुद्दल व व्याज मिळून रक्कम रूपये 2,08,83,000/- ची थकबाकी आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार कर्ज वसुलीचे अधिकार सनियंत्रण समितीस आहेत. तथापि, मागील ब-याच कालावधीपासून सनियंत्रण समितीच्या सभाच झालेल्या नाहीत. सबब कोटयावधी रक्कमेच्या गुंतवणुकीवर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांचे नियंत्रण नसलेचे दिसून येते. याबाबत साधार स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. थकीत कर्ज वसुलीबाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांचे कोणतेही प्रयत्न दिसून येत नाहीत.

2) सदर कर्जाची नोंदवही मार्च 2012 नंतर अपुर्ण आहे. सदर नोंदवहीत नोंदी घेतलेल्या नाहीत.

3) सदर थकीत कर्ज व व्याज वसुलीबाबत स्थानिक निधी लेखा विभागाकडील लेखापरीक्षण अहवालात गतवर्षी सातत्याने आक्षेप नोंदवून सुध्दा त्यांची दखल घेतलेचे दिसून येत नाही.

4) सदर संस्थांचे सहकार विभागाकडून कोणत्या कालावधीअखेर लेखापरीक्षण झाले आहे व त्यातील अभिप्राय तसेच थकीत मुद्दल व व्याज याबाबत तपशिल सादर होणे आवश्यक आहे.

**3.705 शेळया मेंढयांना जंत नाशक औषधे पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परीषद, सांगली चे सन 2015-2016 चे लेखापरीक्षण करताना शेळया मेंढ्यांना वर्षातून कमीत कमी दोन वेळा जंतनाशक औषधे खरेदी करण्याकरिता 2 प्रमाणकान्वये जिल्हा परिषद स्विय निधीमधुन रक्कम रुपये 4,99,999/- झालेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयुक्त, पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/305/387/12/पं.स.12, दिनांक 14/03/2014 नुसार दर पत्रकान्वये खरेदी केलेल्या औषधांची गुणवत्ता तपासणी बाबत मुद्दा क्रमांक 7 अ नुसार तपासणीसाठीचे नमुने जिल्हा व पशुवैद्यकीय दवाखान्याकडे जतन करुन ठेवणे जरुरीचे आहे. सदर प्रमाणे कार्यवाही झाली किंवा कसे? याबाबत लेखापरीक्षणास खात्री करून दयावी.

2) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/305/387/12/पं.स.12, दिनांक 14/03/2014 नुसार दर पत्रकान्वये खरेदी केलेल्या औषधांची गुणवत्ता तपासणी बाबत मुद्दा क्रमांक 11 नुसार तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रयोगशाळेकडुन निवादाधारकनिहाय तपासणी शुल्क देयके प्राप्त करुन घेवुन सदर देयकाची प्रत निविदाधारकास दरकरार कंपनीस पाठवून तपासणीबाबतचे शुल्क धनादेश / धनाकर्ष स्वरुपात प्रयोगशाळेच्या नांवे स्विकारावे व आपले मार्फत अदा करावे, असे नमूद आहे. परंतू, त्यानुसार कार्यवाही झाली नाही.

3) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/326/1352/2014/पं.स.12, दिनांक 31/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 8 नुसार कार्यालय प्रमुखांनी स्वत:च्या उपस्थितीत व इतर दोन अधिका-यांच्या समोर साहित्याचे पार्सल फोडावे व वस्तुंची नोंद साठा नोंदवहीला घ्यावी. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

4) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/326/1352/2014, दिनांक 31/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार रक्कम रुपये 5,000/- पेक्षा जास्त रक्कमेची मागणी असल्यास पुरवठादाराकडून औषधांचा थेट पुरवठा तालुका स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी सदरचे दर मंजुर असताना औषधे मुख्यालय स्तरावर घेवुन त्यानंतर तालुकानिहाय वाटप केलेली आहेत.

5) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/326/1352/2014, दिनांक 31/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 15 नुसार पशुवैद्यकीय दवाखाना प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात गेल्या तीन वर्षात उपचारासाठी आलेल्या पशु रुग्णांच्या आजाराचा आढावा घेवुन औषधांची मागणी करावी. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) औषधाचे जिल्हास्तरीय एकत्रित मागणीपत्र व तालुकानिहाय मागणीपत्र यामध्ये तफावत दिसुन येते. तसेच पंचायत समिती कवठे महांकाळ येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांचे मागणी पत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं-2014/प्रक्र.82/भाग-3/ उदयोग 4, दिनांक 30/10/2015 मधील 3.2.1 अन्वये बाजार दराशी तुलना करुन साहित्य खरेदी बाबत सुचना केल्या आहेत त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं-2014/प्रक्र.82/भाग-3/ उदयोग 4, दिनांक 30/10/2015 मधील 2.9.3 ब नुसार जिल्हा स्तरीय खरेदी समिती स्थापन करुन खरेदी करण्याबाबत सुचीत केलेले आहे. सदर समितीचा खरेदी ठराव नस्तीसोबत लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

9) डिलीव्हरी चलन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. सबब साहित्य विहित मुदतीत प्राप्त झाले किंवा कसे? याची खात्री होत नाही.

10) तालुका स्तरावरुन औषधांचे विनियोग दाखले व फलश्रुती अहवाल प्राप्त करुन घेतलेले नाहीत.

11) प्रमाणक क्रमांक 682, दिनांक 31/03/2016 रक्कम रूपये 1,99,960/- नुसार खरेदी केलेल्या Inj.Ivermectin याचा शासनमान्य संस्थेचा तपासणी अहवाल नस्तीसोबत नाही.

**3.706 जिल्हा वार्षिक योजना औषधे खरेदी व वंध्यत्व निवारण शिबिर यावरील खर्च.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परीषद, सांगली चे सन 2015-2016 चे लेखापरीक्षण करताना हस्तांतर निधीमधुन वंध्यत्व निवारण शिबीरासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत औषधे खरेदी खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/305/387/12/पं.स.12, दिनांक 14/03/2014 नुसार दर पत्रकान्वये खरेदी केलेल्या औषधांची गुणवत्ता तपासणी बाबत मुद्दा क्रमांक 7 अ नुसार तपासणीसाठीचे नमुने जिल्हा व पशुवैद्यकीय दवाखान्याकडे जतन करुन ठेवणे जरुरीचे आहे. सदर प्रमाणे कार्यवाही झाली का कसे? याबाबत लेखापरीक्षणास खात्री करून दयावी.

2) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/305/387/12/पं.स.12, दिनांक 14/03/2014 नुसार दर पत्रकान्वये खरेदी केलेल्या औषधांची गुणवत्ता तपासणी बाबत मुद्दा क्रमांक 11 नुसार तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रयोगशाळेकडुन निवादाधारकनिहाय तपासणी शुल्क देयके प्राप्त करुन घेवुन सदर देयकाची प्रत निविदा धारकास / दरकरार कंपनीस पाठवून तपासणीबाबतचे शुल्क धनादेश / धनाकर्ष स्वरुपात प्रयोगशाळेच्या नांवे स्विकारावा. सदरप्रमाणे कार्यवाही केली किंवा कसे? याबाबत लेखापरीक्षणाची खात्री करुन दयावी.

3) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/326/1352/2014/पं.स.12, दिनांक 31/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 8 नुसार कार्यालय प्रमुखांनी स्वत:च्या उपस्थितीत व इतर दोन अधिका-यांच्या समोर साहित्याचे पार्सल फोडावे व वस्तुंची नोंद साठा नोंदवहीला घ्यावी, असे असताना तशा प्रकारची कार्यवाही झालेची खात्री पटवावी.

4) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/326/1352/2014, दिनांक 31/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार रक्कम रुपये 5,000/- पेक्षा जास्त रक्कमेची मागणी असल्यास पुरवठादाराकडून औषधांचा थेट पुरवठा तालुका स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी सदरचे दर मंजुर असताना औषधे मुख्यालय स्तरावर घेवुन त्यानंतर तालुकानिहाय वाटप केलेली आहेत.

5) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक डीडीडी/326/1352/2014, दिनांक 31/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 15 नुसार पशुवैद्यकीय दवाखाना प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात गेल्या तीन वर्षात उपचारासाठी आलेल्या पशु रुग्णांच्या आजाराचा आढावा घेवुन औषधांची मागणी करावी. सदर प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) जिल्हास्तरीय एकत्रित मागणीपत्र व तालुकानिहाय मागणीपत्र यामध्ये तफावत दिसुन येते.

7) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं-2014/प्रक्र.82/भाग-3/ उदयोग 4, दिनांक 30/10/2015 मधील 3.2.1 अन्वये बाजार दराशी तुलना करुन साहित्य खरेदी करणेबाबत सुचना केल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं-2014/प्रक्र.82/भाग-3/ उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील 2.9.3 ब नुसार जिल्हा स्तरीय खरेदी समिती स्थापन करुन खरेदी करण्याबाबत सुचीत केलेले आहे. सदर समितीचा खरेदी ठराव नस्तीसोबत लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

9) डिलीव्हरी चलनावर दिनांकित स्वाक्षरीसह पोहोच घेतलेली नाही. सबब साहित्य विहित मुदतीत प्राप्त झाले, याची खात्री होत नाही.

10) प्रमाणक क्रमांक 1221, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 4,44,062/- ही जॅकसन लॅबोरेटरी अमृतसर यांस अदा केलेली आहे. तथापि, पुरवठादार यांनी विलंबाने औषधाचा पुरवठा केल्याने दंडाची रक्कम रुपये 44,237/- वजा जाता उर्वरीत रक्कम अदा केल्याची पोहोच नस्तीसोबत उपलब्ध झालेली नाही. सबब दंडाची रक्कम वसुल केल्याची खात्री करता आली नाही.

11) पुरवठादार कंपन्यांकडून विलंबाने पुरवठा झाल्याचे दिसुन येते. सबब दरकरारातील अट क्रमांक 11 नुसार पुरवठा आदेशापासून 60 दिवसांचे आत पुरवठा न झाल्यास एकुण रक्कमेवर प्रतीआठवडा 0.5 टक्के दराने दंडाची आकारणी करणेबाबत नमुद आहे. संबंधीत पुरवठादाराकडून दंडाची रक्कम रूपये 34,585/- वसुल झाल्याचे खात्री करुन द्यावी.

12) तालुका स्तरावरुन औषधांचे विनियोग दाखले व फलश्रुती अहवाल प्राप्त करुन घेतलेले नाहीत.

### 3.707 जिल्हा परिषद स्वनिधीतून 5 लिटर क्षमतेच्या प्लॅस्टिकच्या अनब्रेकेबल किटल्या पुरवठा करणे खर्चातील अनियमितता

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर चे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणामध्ये प्रमाणक क्रमांक 724, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 15,58,666/- ची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद सेसमधुन कोणत्या योजना पशुसंवर्धन खात्यामार्फत राबविता येऊ शकते अशा कामांची यादी महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 100 प्रमाणे पहिल्या अनुसूचीमधील पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय या शिर्षका खालील निवडता येणाऱ्या कामांची अनुक्रमांक 14 ते 17 च पर्यंत कामे नमुद असून किटली खरेदी नमूद नसल्याने सदरील खरेदी ही नियमबाहय आहे. त्यामुळे सदरील खरेदी वर खर्च झालेली रक्कम रुपये 15,58,666/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविणेत आलेली नाही.

3) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989 नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे, परंतु अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडुन राबविण्यात आलेल्या याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षीही लाभ दिला गेला नाही हे तपासता आले नाही. फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेत आलेले नाहीत.

4) पुरवठा आदेश जिप/पशुसं/तां/633/2016, दिनांक 31/03/2016 व दिनांक 31/03/2016 रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यातील शर्ती व अटीनुसार हमी कालावधी हा एक वर्षाचा राहील तसेच साहित्याचा पुरवठा झाल्यानंतर हा हमी कालावधी सुरु होईल असे असतांना रक्कम रुपये 36,000/- ची सुरक्षा ठेव ही दिनांक 01/04/2017 नंतर प्रदान करणेऐवजी दिनांक 06/03/2017 रोजी प्रदान करणेत आलेली आहे. (साहित्याचा पुरवठा विभागाकडील स्टॉक बुक नमुना नंबर 33 पान नंबर 189 दिनांक 31/03/2016)

5) सदरील योजना ही 75 टक्के अनुदानावर असलेने 25 टक्के अनुदान हे लोकहिस्सा आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1084/सीआर-1633/57, दिनांक 19/01/1985 ज्या योजनेतील कामावर लोकवर्गणी अपेक्षित आहे त्या कामावर लोकवर्गणी जमा झाल्याशिवाय खर्च न करण्याबाबत स्पष्ट सुचना असतांना लोकवर्गणीचा हिस्सा रक्कम रुपये 3,89,631/- तालुक्यांकडुन जमा झालेले दिसुन येत नाही. रक्कम जमा केल्याबाबतची चलने लेखापरीक्षणास दर्शवुन अनुपालन सादर करावे.

6) एकुण नग 10055 प्रति नग रक्कम रुपये 155/- प्रमाणे खरेदी करणेत आलेली आहे. ज्याची अदायीची रक्कम रुपये 1,55,825/- होते. तथापि रक्कम रुपये 1,58,666/- ची अदायी करणेत आलेली आहे. यानुसार रक्कम रुपये 141/- ची जादाची अदायी करणेत आलेली आहे.

7) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 मधील परि. 1 कलम 63 नुसार ठेकेदाराबरोबर / सेवा पुरवठादाराबरोबर करारनामा करताना रूपये 10 लक्ष पर्यंत कामासाठी रूपये 100/- च्या स्टँपपेपर व त्यावरील प्रत्येक एक लाखासाठी रूपये 100/- याप्रमाणे एकुण रक्कम रुपये 700/- च्या किंमतीच्या स्टँपपेपरवर करारनामा करणे आवश्यक होते. तथापि, याप्रमाणे कार्यवाही न करता रक्कम रूपये 500/- चा स्टँप पेपरवर करारनामा केलेला आहे. त्यामुळे रक्कम रूपये 200/- सबंधीताकडून वसूल करून मुद्रांक शुल्क खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

8) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1010/प्र.क्र.68/भाग-2/कोषा प्र-5, दिनांक 31/01/2013 अन्वये लाभार्थी किंवा पुरवठादाराला शासकीय प्रदाने करतांना वेळेचा अपव्यय होऊ नये तसेच अशा प्रदानात पारदर्शकता असावी या दृष्टीने प्रदान होणाऱ्या रक्कम रुपये 5,000/- च्या वरील सर्व प्रकारची प्रदाने ही अदात्याच्या किंवा लाभार्थ्यांच्या खात्यात इलेक्ट्रॉनिक्स पध्दतीने थेट प्रदान करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

**3.708 जिल्हा मध्यवर्ती कारागृहाकडुन फर्निचर खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर चे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणामध्ये प्रमाणक क्रमांक 911, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 5,52,600/- ची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा मध्यवर्ती कारागृहाला प्रोफार्मा बिलापोटी रक्कम रुपये 5,52,600/- धनादेश क्रमांक 035867 दिनांक 31/03/2016 अन्वये प्रदान केलेली आहे. सदरील रक्कम जिल्हा मध्यवर्ती कारागृहाला दिनांक 23/05/2016 अन्वये प्राप्तही झालेली आहे. तथापि अदयापपर्यंत फर्निचर विभागास अप्राप्त आहे. रक्कम प्रदान होऊन एक वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. सदरील साहित्याचा पुरवठा होत नसेल तर संबंधीतांकडुन सदरील रक्कमेची वसुली करावी व शासन खाती जमा करुन अनुपालन दर्शवावे.

2) जिल्हा परिषदेने जंगम मालमत्ता नोंदवही नमुना नंबर 32 मध्ये वस्तु जमा झाल्याच्या नोंदीही घेतलेल्या आहेत. जर जिल्हा परिषदेकडे साहित्याचा पुरवठाच झालेला नाही, तर साहित्याची जमा नोंद जंगम मालमत्ता नोंदवही नमुना नंबर 32 ला कशी काय घेण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 नियम 90 (01)(02) नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. तथापि याप्रमाणे कार्यवाही न होता या नियमाचे उल्लंघन झालेले आहे.

**3.709 रुग्णालये व दवाखाने या शिर्षाखाली केलेल्या औषध खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,55,816/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाने सन 2015-16 सदर योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे औषध खरेदी केली आहे. याबाबत संबंधीत तालुक्यांकडून विहित नमुन्यामध्ये मागणी पत्रे घेण्यात आलेली नाहीत. तथापि कोणत्या निकषाआधारे औषध खरेदीची संख्या ठरविण्यात आली ते स्पष्ट होत नाही. त्यामुळे या योजनेवर करण्यात आलेल्या खर्चाचा उद्देश निव्वळ निधी खर्च करणे एवढाच आहे असे स्पष्ट होते.

2) उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-6, दिनांक 02/01/1992 मधील अ.क्रमांक 8.4 परिशिष्ट-8 अन्वये प्राप्त झालेल्या औषधाची तपासणी करणे आवश्यक असताना तसेच पुरवठा आदेशात औषधांचे गुणवत्ता चाचणी अहवाल पुरवठ्यासोबत घेणे आवश्यक असताना असे अहवाल प्राप्त करुन घेण्यात आलेले नाहीत. तथापि खरेदी केलेल्या औषधांच्या दर्जाची खात्री कशाच्या आधारे केली ते स्पष्ट होत नाही.

3) काही औषधांचे उत्पादन तारीख, मुदतबाह्य होण्याची तारीख, बँच क्रमांक इ. देयकावर नमूद नाही. तथापि मुदतबाह्य किंवा कमी मुदत असलेली औषधे खरेदी केल्याची शक्यता नाकारता येत नाही. बहुतांश औषधांचे पक्के बिल उपलब्ध नाही. केवळ कर चलन, विक्री चलन उपलब्ध आहे. काही चलने झेरॉक्स प्रतीत आहेत. तरी मूळ प्रती आवश्यक आहेत

**3.710 कामधेनू दत्तक ग्राम योजना.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत 7 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,36,17,654/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक नापुयो-2010/प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 अन्वये दत्तक ग्रामाची निवड करताना सदर गावामध्ये पैदास सक्षम गाई / म्हशींची संख्या किमान 300 असावी असे नमूद आहे. तथापि, विभागाने गावामध्ये गाई / म्हशींची संख्या 300 पेक्षा कमी असताना दत्तक ग्राम म्हणून निवड केली आहे.

गाई / म्हशींची संख्या 300 पेक्षा कमी असतानाही निवड केल्याने सदर गावावर केलेला खर्च रूपये 1,52,000 X 4 = रुपये 6,08,000/- लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

2) कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक नापुयो-2010/प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 अन्वये योजनेचा प्रगती अहवाल सर्व कार्यक्रमाच्या टप्पेनिहाय अंमलबजावणीच्या आवश्यक त्या नोंदी ठेवून कार्यक्रम अंमलबजावणीच्या प्रत्यके टप्प्यानंतर तसेच दरमहा संबंधीत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त यांना सादर केल्याबाबतचे अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही सादर केलेले नाहीत.

3) सदर योजना सुरु केल्यापासून आणि सर्व कार्यक्रम नियोजनबध्द पध्दतीने राबविल्यानंतर म्हणजेच एकूण 6 महिन्याच्या कालावधीनंतर योजना पूर्ण झाल्यानंतर सर्व दुधाळ जनावरांचे दुध उत्पादनाबाबत पुन्हा सर्वेक्षण करुन सदर दत्तक गावामध्ये दैनदिन किती वाढ झाली आहे, यांची माहिती अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही सादर केलेली नाही.

4) जंतनाशक शिबीराचे आयोजन करताना नव्वद दिवसांचे अंतराने तीन जंतनाशक शिबीरीचे आयोजन करणे आवश्यक असताना पत्र क्रमांक जिपसो/पशुस/ता-2/1068/2015, दिनांक 07/09/2015 अन्वये दिनांक 15/09/2015 ते दिनांक 20/09/2015 या कालावधीत जंतनाशक शिबीराचे आयोजन करावे, असे सूचित केले आहे. तरी शासन मार्गदर्शक सूचनाचे पालन न करता एकाच शिबीराचे आयोजन केल्याने सदर बाबीवर केलेला खर्च निष्फळ ठरत आहे.

5) मे.समर इंडीया, लखनौ या कंपनीस कामधेनू योजनेखाली Fecos Plus, Admire Vet Plus-200 gm, Ostocalmom 12-vet forte 500 ml व Admire Vet 100 gm पुरवठा करण्यासाठी पुरवठा आदेश दिनांक 17/02/2016 अन्वये दिला होता. दरकरारानुसार पुरवठयाची मुदत 60 दिवस इतकी होती. सदर 60 दिवसाची मुदत दिनांक 16/04/2016 रोजी संपते. तथापि, समर इंडीया कंपनीने Minaral Feed Bolus चा पुरवठा विलंबाने केला आहे.

तरी सदर विलंबाबाबत दंड रुपये 15,336/- वसूल करणे आवश्यक आहे.

**3.711 जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत विविध पशुवैदयकीय दवाखाना यांना औषध पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 55,79,411/- एवढा खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुसंवर्धन विभागाने अनुक्रमांक 1 प्रमाणकामधील पुरवठा आदेशान्वये रूपये 5,26,135/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी केलेली आहे. सदर औषधाचे तपासणी अहवाल Lignocine Inj. 30ml औषध बॅच नंबर 3301 चा दिनांक 01/02/2016 रोजी घेण्यात आलेला आहे. म्हणजेच सदरचा चाचणी अहवाल दिनांक 11/02/2016 रोजी दिलेल्या पुरवठा आदेशापूर्वी घेण्यात आलेला आहे. तसेच Meloxicam & paracetamol बॅच नंबर 1202 चा तपासणी अहवाल दिनांक 09/03/2016 रोजी घेण्यात आलेला असून तालुकास्तरावरील इनवहाइस पाहता त्यापूर्वी क्षेत्रीयस्तरावर औषधे प्राप्त झालेले दिसून येते व बॅच नंबर 1102 चा तपासणी अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे पुरवठा ओदशापूर्वी तपासणी केलेले औषध व तपासणी अहवालाशिवाय औषधांचा वापर केलेला आहे.

2) औषध खरेदीपूर्वी तालुका पशुवैदयकीय दवाखाना यांची सदर औषधाबाबतची मागणी घेण्यात आलेली नाही. त्यांमुळे प्राप्त अनुदानाचा खरेदी रक्कमेशी मेळ घेऊन पुरवठा आदेश दिलेला आहे.

3) औषध खरेदी पुरवठा आदेशामध्ये Expiry Date बाबत Long Expiry Date असावी असे नमूद करण्यात आलेले आहे. परंतु, सदर आदेशामध्ये Expiry Date चा कालावधी नमूद करणे आवश्यक आहे.

4) अनुक्रमांक 2 प्रमाणकामधील पुरवठा आदेशान्वये एकूण 4970 नग FENBENBAOLE SUSP. 1000 ml औषध खरेदी करण्यात आलेली असून तालुकास्तरावरील वाटप नग पाहता एकूण 4971 नग पुरवठा केल्याचे दिसते. म्हणजेच 1 नग पुरवठा कोणत्या तालुक्यास जादा वाटप झालेले आहे याबाबतचा लेखापरीक्षणास समर्पक खुलासा करणे आवश्यक आहे.

5) अनुक्रमांक 4 प्रमाणकामधील औषध खरेदीचे चाचणी अहवाल दिनांक 06/04/2016 रोजी घेण्यात आलेले आहे. म्हणजेच पुरवठादाराचे बील अदा केल्यानंतरचे व तालुका स्तरावर सदर औषध पुरवठा केल्यानंतर चाचणी अहवाल न घेताच देयकाचे प्रदान करण्यात आले आहे.

6) अनुक्रमांक 5 प्रमाणकामधील पुरवठा आदेशासोबत जोडलेल्या तालुका औषध वाटप तक्ता पहाता Tr. Iodine 500 ml हे औषधाचे तालुका अक्कलकोटला 225 नग वाटप करावयाचे असताना तालुका औषध प्राप्त इनव्हाइस मध्ये 255 नग प्राप्त झाल्याचे दिसून येते. तसेच सदर प्रमाणकान्वये खरेदी केलेली औषधांचा पुरवठा तालुका मोहोळ यांना पुरवठा झालेबाबतचे औषध प्राप्त इनव्हाइस दिसून आले नाही.

7) अनुक्रमांक 6 प्रमाणकामधील F-Zole IN Bolus या औषाधाचे बॅच नंबर F1605 चे तपासणी अहवाल घेण्यात आलेला दिसून येत नाही. तरी सदर औषधाचा तपासणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने व पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार तपासणी अहवालाशिवाय पुरवठादारास रक्कम अदा केल्याने सदर बॅच नंबरचे औषध नग 3100 x 17.94 = रुपये 55,614/- रक्कम अमान्य करण्यात येत आहे.

8) अनुक्रमांक 6 प्रमाणकामधील औषधांचे बॅच नंबर CS1606 व बॅच नंबर F1602 चे चाचणी तपासणी अहवाल अनुक्रमे दिनांक 02/04/2016 व दिनांक 04/04/2016 रोजी घेण्यात आलेले आहे. तालुकास्तरावरील प्राप्त पुरवठा इनव्हाइस पाहता त्यांना दिनांक 31/03/2016 पर्यंत औषध पुरवठा झाल्याचे दिसते. सदर औषध खरेदीची रक्कम पुरवठादारास दिनांक 31/03/2016 रोजी अदा करण्यात आलेली आहे. म्हणजेच औषध पुरवठा झालेनंतर व पुरवठादारास रक्कम अदा केल्यानंतर सदर औषध बॅच नंबरचे चाचणी अहवाल घेण्यात आलेले आहे.

9) अनुक्रमांक 7 व 8 प्रमाणकामधील काही औषधाचे चाचणी तपासणी अहवाल दिनांक 19/03/2016 व दिनांक 18/03/2016 रोजी घेण्यात आलेले असून तालुकास्तरावर सदर औषधांचा पुरवठा तपासणी अहवाल घेण्यापूर्वी (प्रमाणक अनुक्रमांक 7 बाबत - बार्शी, मोहोळ, मंगळवेढा, माढा व प्रमाणक अनुक्रमांक 8 बाबत- दक्षिण, उत्तर, सांगोला, करमाळा, माढा, माळशिरस, माहोळ, अक्कलकोट व मंगळवेढा) करण्यात आलेला आहे.

10) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विविध पशुवैद्यकीय दवाखाना यांना औषध पुरवठा करणे योजनेसाठी सन 2015-2016 साठी एकूण 100 लक्ष इतके अनुदान प्राप्त झालेले होते. त्यानुसार औषध खरेदीची प्रक्रिया करुन पशुसंवर्धन विभागाने अतिरिक्त मुख्य कार्यकारी यांचे सहीचे रक्कम 99,99,887.32 इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश

क्रमांक 275 ते 287, दिनांक 11/02/2016 रोजी संबंधीत पुरवठादारांना देण्यात आलेला होता. परंतु, काही पुरवठादारांनी दिनांक 31/03/2016 अखेर एकूण रूपये 4240439.41/- एवढ्या रक्कमेच्या औषधांचा पुरवठा केलेला दिसून येत नाही.

11) सदर योजनेखाली बीडीएस वरुन किती रक्कम काढली? त्याबाबतचे प्रमाणक व अनुषंगीक आदेश उपलब्ध न झाल्याने सदरबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

**3.712 50 टक्के अनुदानावर पशुपालकांना कडबाकुट्टी यंत्र पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 54,92,475/- खर्च करण्यात आला आहे. पशुसंवर्धन विभागाने सन 2015-2016 मध्ये राबविलेल्या सदर योजनेबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी प्रभावी अंमलबजावणी व नियोजन विशिष्ट मुदतीत होण्यासाठी दिलेल्या कार्यक्रमपत्रिकेनुसार कार्यवाही करणेबाबत, सूचित केले असतानाही त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. साहित्य वाटप 30 नोव्हेंबरपूर्वी करणे आवश्यक असताना साहित्य प्राप्त मार्च महिन्यात व वाटप पुढील आर्थिक वर्षात, ही अनियमितता आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/ 34/67, दिनांक 01/09/1993 व पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना क्रमांक 9 नुसार एकाच कुटूंबात दुबार लाभ दिला जाणार नाही, असे असताना एकाच कुटूंबातील व्यक्तींना व काही गावांतील व्यक्तींना दुबार लाभ अदा केला आहे. सदर दुबार लाभापोटी रक्कम रूपये 69,525**/-** वसूलात आणावी.

3) विभागाने सादर केलेली विषयाची नस्ती क्रमांक 11 नुसार लाभार्थी निवड यादी फक्त 397 लोकांची आहे. प्रत्यक्षात दोन्ही पुरवठा आदेशान्व्ये एकूण 711 कडबाकुट्टी यंत्रांचा पुरवठा करणेचा आदेश देण्यात आलेला आहे. तरी उर्वरीत 314 यंत्रांचा लाभ अदा केल्याबाबत, लाभार्थी मागणी, मंजूरी, वाटप इत्यादी कागदपत्रे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाहीत.

4) पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना क्रमांक 12 नुसार निवड केलेल्या लाभार्थींचे एक दिवसाचे प्रशिक्षण तालुकास्तरावर आयोजित केलेबाबत कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

5) मार्गदर्शक सुचना क्रमांक 14 नुसार 50 टक्के लाभार्थी हिस्सा जमा झाल्यानंतर प्राप्त धनाकर्षांच्या आधारे तालुका निहाय कडबाकुट्टी यंत्र पुरवठ्याचे आदेश दयावयाचे आहेत. याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसत नाही.

6) मार्गदर्शक सुचना क्रमांक 17 नुसार यंत्र वाटप झाल्यानंतर लाभार्थीसह युनिटचा फोटो काढून त्याची एक प्रत, लाभार्थ्याचे नांव, पत्ता, व मोबाईल क्रमांकासह जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. याप्रमाणे पुर्तता नस्तीस दिसत नाही.

7) मार्गदर्शक सुचना क्रमांक 20 नुसार पुरविण्यात आलेले कडबाकुट्टी यंत्र, विद्युत मोटार व सुटे भाग यांची कमीत कमी 3 वर्षे विक्री करणार नाही, असे बंधपत्र लाभार्थ्यांकडून लिहून घेतलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास सादर झाली नाही.

8) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील नियम 4.5.2 व परिशिष्ट क्रमांक 11 नुसार खरेदी अधिका-याकडून प्रमाणपत्र घेतलेले नाही.

**3.713 सर्वसाधारण योजनेअंतर्गत पशुवैदयकीय संस्थांना औषध पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 47,49,870/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खात्याचे पत्र क्रमांक डीडीडी 305/334/पस 12, दिनांक 25/03/2014 अन्वये सदर औषधाची गुणवत्ता तपासणी झाल्याची खात्री करुनच दरकरारातील कंपनीस देयके अदा करण्यात यावी असे असतांनी सदर औषधाचा गुणवत्ता तपासणी अहवाल उपलब्ध नसतांना रक्कमेचे प्रदान करण्यात आलेले आहे.

2) विभागाने औषधी खरेदी करण्यापुर्वी संबंधीत पशुवैद्यकीय दवाखान्यांकडून मागणी निश्चीत करणे आवश्यक होते. मात्र संबंधीत पशुवैदयकीय दवाखान्याकडून तशी वर्षभराची मागणी निश्चीत न करता जिल्हा स्तरावरुन औषधाची मागणी निश्चीत करण्यात आली आहे.

3) सदरची औषध खरेदी ही सन 2015-16 या वित्तीय वर्षाची असतांनी प्रत्यक्षात साहीत्याचा पुरवठा दिनांक 31/03/2016 नंतर म्हणजेच सन 2016-17 या वित्तीय वर्षात झाला असल्याने योजनेचा उददेश सफल झाला नसल्याचे दिसते.

4) सदर औषधींचा पुरवठा हा दिनांक 31/03/2016 नंतर प्राप्त झाला असतांना सदर देयकाची रक्कम दिनांक 31/03/2016 रोजी कशाच्या आधारे खर्ची टाकण्यात आली.

5) पशुवैदयकीय दवाखान्याच्या स्तरावर साठानोंदवही औषधाची नोंद घेतल्यानंतर विल्हेवाटीच्या स्वाक्षरी वितरण नोंदवहीत स्वतंत्र घेतल्या जात नाहीत. विल्हेवाटीच्या नोंदीबाबत आजारी पशुमालकाची ओ.पी.डी. नोंदवहीत औषध दिल्याबददल स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना तशाप्रकारे स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे औषधांचे विल्हेवाटीबाबत पडताळणी करता येत नाही.

6) पशूवैदयकीय दवाखान्यांना वितरीत करण्यात आलेल्या औषधीबाबतचे मासीक तथा त्रैमासीक विल्हेवाटीबाबतचे अहवाल विभागाने मागविणे आवश्यक असतांनी तशाप्रकारे अहवाल मागविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे औषधांचा योग्य वापर झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

7) सदरचा औषधी पुरवठा केल्यानंतर संबंधीत पशुवैदयकीय दवाखान्याकडून त्याबाबतची उपयोगीता प्रमाणपत्रे व विल्हेवाटीबाबतची अभिलेखे घेण्यात आलेली नाहीत.

8) सदरचे औषधी हे कोणत्या वाहनाने पुरविण्यात आले याबाबत सदर वाहनाचा प्रकार व क्रमांक साठा पुस्तकात नमूद नाही. त्यामुळे सदर साहीत्य कशाने पुरविण्यात आले याबाबत पडताळणी करता आली नाही.

9) उपरोक्त नमूद औषधी खरेदीचे प्रमाणकावर जिल्हा पशुवैदयकीय अधिकारी यांचे साहित्य सुस्थितीत व योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाल्याबाबत प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

### 3.714 आदिवासी क्षेत्र उपयोजनेअंतर्गत पशुवैदयकीय संस्थांना औषध पुरवठा करणे.

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,57,947/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खात्याचे पत्र क्रमांक डीडीडी 305/334/पस 12, दिनांक 25/03/2014 अन्वये सदर औषधाची गुणवत्ता तपासणी झाल्याची खात्री करुनच दरकरारातील कंपनीस देयके अदा करण्यात यावी असे असतांनी सदर औषधाचा गुणवत्ता तपासणी अहवाल उपलब्ध नसतांना रक्कमेचे प्रदान करण्यात आलेले आहे.

2) विभागाने औषधी खरेदी करण्यापुवी संबंधीत पशुवैदयकीय दवाखान्यांकडून मागणी निश्चीत करणे आवश्यक होते. मात्र संबंधीत पशुवैदयकीय दवाखान्याकडून तशी वर्षभराची मागणी निश्चित न करता जिल्हा स्तरावरुन औषधाची मागणी निश्चीत करण्यात आली आहे.

3) सदरची औषध खरेदी ही सन 2015-16 या वित्तीय वर्षाची असतांनी प्रत्यक्षात साहीत्याचा पुरवठा दिनांक 31/03/2016 नंतर म्हणजेच सन 2016-17 या वित्तीय वर्षात झाला असल्याने योजनेचा उददेश सफल झाला नसल्याचे दिसते.

4) सदर औषधींचा पुरवठा हा दिनांक 31/03/2016 नंतर प्राप्त झाला असतांना सदर देयकाची रक्कम दिनांक 31/03/2016 रोजी कशाच्या आधारे खर्ची टाकण्यात आली.

5) उपरोक्त नमूद औषधी ही पंचायत समीती धारणी व चिखलदरा अंतर्गत पशुवैदयकीय दवाखान्यांना वाटप करण्यात आल्याचे विभागाचे साठा पुस्तकावरून दिसते मात्र सदर पशुवैदयकीय दवाखान्यांची साठापुस्तके लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने सदर औषधाचे विल्हेवाटीबाबत लेखापरिक्षणात पडताळणी करता आली नाही.

6) पशुवैदयकीय दवाखान्यांना वितरीत करण्यात आलेल्या औषधीबाबतचे मासीक तथा त्रैमासीक विल्हेवाटीबाबतचे अहवाल विभागाने मागविणे आवश्यक असतांनी तशाप्रकारे अहवाल मागविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे औषधांचा योग्य वापर झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

7) सदरचा औषधी पुरवठा केल्यानंतर संबंधीत पशुवैद्यकीय दवाखान्याकडून त्याबाबतची उपयोगीता प्रमाणपत्रे व विल्हेवाटीबाबतची अभिलेखे घेण्यात आलेली नाहीत.

8) सदरचे औषधी हे कोणत्या वाहनाने पुरविण्यात आले याबाबत सदर वाहनाचा प्रकार व क्रमांक साठा पुस्तकात नमूद नाही. त्यामुळे सदर साहीत्य कशाने पुरविण्यात आले याबाबत पडताळणी करता आली नाही.

9) उपरोक्त नमूद औषधी खरेदीचे प्रमाणकावर जिल्हा पशुवैदयकीय अधिकारी यांचे साहीत्य सुस्थीतीत व योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाल्याबाबत प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.715 जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत पशु वैधकीय दवाखाण्या करीता इमारत बांधकाम / बळकटीकरण अंतर्गत लॅपटॉप, साहित्य खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत रक्कम रूपये 49,98,842/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाचे जंगम मालमत्ता नोदंवही (साठा पुस्तक) पान क्रमांक 40, 41 व 42 नोंद घेण्यात आलेल्या आहेत व साहित्य वाटप दर्शविण्यात आले आहे. परंतु, साहित्य वाटपाबाबत संबधीतांच्या स्वाक्षऱ्या साठा रजिस्टरवर घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर चे साहित्य पशुवैद्यकीय दवाखान्याकरीता वाटप केल्याची खात्री पटत नाही.

2) दर कराराची तपासणी केली असता संबंधीत अधिकारी यांची किवा सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही. तसेच दिनांक सुध्दा नमुद नाही, असे असतांना दर करार योग्य झाल्याची खात्री पटत नाही.

3) सदर योजने अंतर्गत एकूण 77 लॅपटॉप खरेदी प्रस्तावित असतांन 91 लॅपटॉप खरेदी करण्यात आले. प्रस्तावित पेक्षा जादा 14 लॅपटॉप खरेदी बाबत मंजुरात दर्शवावी. अनुपालन करण्यात यावे.

4) पंचायत समितीत, बाळापुर यंना 10 नग लॅपटॉप पुरविण्यात आले. परंतु, याबाबत पुरवठा आदेश नस्तीत नाही. पुरवठा आदेश नसताना लॅपटॉप पुरविण्याचे प्रयोजन काय ? खुलासा सादर करण्यात यावा.

5) सदर साहित्य सर्व पंचायत समिती स्तरावर पुरवठा करण्यात आल्याबाबत पोच पावत्या लेखापरिक्षणास पडताळणी करीता उपलब्ध करण्यात आल्या नाहीत. तसेच पशुवैद्यकिय दवाखान्याची जडवस्तु संग्रह नोंदवहीत नोंदी घेवुन दर्शवावे.

**3.716 पशुवैधकीय दवाखान्याचे बाधकाम / बळकटीकरण करणे अंतर्गत फर्निचर खरेदी करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत रक्कम रूपये 7,34,002/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 अन्वये साहित्याचे गुणवत्ता व दर्जा बाबत शासनाने अधिकृत केलेल्या सक्षम प्रयोगशाळा तथा गुणवत्ता नियंत्रक कार्यालयाकडुन प्रमाणपत्र घेतले असल्याचे नस्तीला आढळत नाही.

2) सदर योजने अंतर्गत साहित्य खरेदी करण्यापुर्वी संबंधीत पशु वैद्यकिय दवाखान्याची मागणी प्राप्त करणे आवश्यक असताना पशुवैद्यकिय दवाख्याण्याची मागणी पत्रे पडताळणीस उपलब्ध करण्यात आली नाहीत.

3) सदर योजने अंतर्गत साहीत्याच्या नोंदी साठा पुस्तक पान क्रमांक 21, 22 व 23 वर घेण्यात आलेल्या आहेत व साहित्य वाटप दर्शविले आहे. परंतु, साहित्य वाटपाबाबत संबंधीताच्या स्वाक्षऱ्या साठा रजिस्टरवर घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर साहित्य पशुवैद्यकिय दवाखान्याकरीता वाटप केल्याची खात्री करता आली नाही.

4) जंगम मालमत्ता विभागाचे साठा पुस्तकावर साहित्याची नोंद असुन कोणत्या पंचायत समितीस किती व कोणते साहित्य वाटप केले? नमुद नाही.

5) नस्तीची पडताळणी केली असता पान क्रमांक 6 वर नमुद केल्याप्रमाणे दवाखान्यातील जुने साहित्य निर्लेखीत करुन मगच नविन साहित्य खरेदी करावयाचे आहे. परंतु, त्या प्रमाणे पालन केलचे आढळत नाही.

6) सदर साहित्य सर्व पंचायत समितीस्तरावर पुरवठा करण्यात आल्याबाबत पोच पावत्या लेखापरिक्षणात पडताळणी करीता उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत. तसेच सदर पशुवैद्यकिय दवाखान्याची जडवस्तु संग्रह नोंदवहीत नोंदी घेतल्याचे दर्शवावे.

**3.717 आदिवासी उपायोजने अंतर्गत आदिवासी लाभार्थींना 100 टक्के अनुदानावर सन 2015-2016 अंतर्गत वैरण बियाणेचा पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत रक्कम रूपये 17,73,240/- खर्च करण्यात आला असून यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर वैरण बियाण्याचा पुरवठा आदेश देण्यापुर्वी तालुका स्तरावरुन मागणी कायम करणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली नाही. मागणी निश्चित केलेली नसताना पुरवठा आदेश देण्यात आला. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) महाराष्ट्र शासन, महसुल वन विभागाचे शासन निर्णय क्रमांक एससी वाय 02/2010/प्र.क्र.16 नुसार नैसर्गिक आपत्ती निवारण्याच्या निधीतुन उन्हाळी व खरीप हंगामात शेतकऱ्यांना वैरण उत्पादनासाठी वैरण बियाने 100 टक्के अनुदानावर मंजुर करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयासोबतच्या मार्गदर्शक सूचनातील मुद्दा क्रमांक 3 नुसार ज्या शेतकऱ्याकडे 3 ते 5 जनावरे आहेत व टपात एक गुमते जनावर आहे. तसेच मुद्दा क्रमांक 4 नुसार अशा शेतकऱ्याकडे किमान 0.40 हेक्टर जमीन आहे, अशा शेतकऱ्याकडुन मुद्दा क्रमांक 6 नुसार वैरण बियाणे मागणीबाबतचे अर्ज प्राप्त करुन लाभार्थीची निवड करण्यात यावी. मात्र तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

3) वैरण बियाण्याची उगवण क्षमता व शुध्दता याबाबतचा प्रयोग शाळेचा चाचणी अहवाल देयकासोबत असणे आवश्यक असतांना तश अहवाल देयकासोबत व नस्तीसोबत सुध्दा नाही. प्रयोगशाळेचा अहवाल नसताना सदर देयकाचे 100 टक्के प्रदान कशाचे आधारे करण्यात आले? खुलासा करण्यात यावा.

4) सदर बियाण्याचा पुरवठा तालुका स्तरावर कोणत्या वाहनाने करण्यात आला? याबाबत वाहनाचा क्रमांक व प्रकार देयकावर नमुद नाही.

5) सदर बियाने वाटप केल्यानंतर बियाणे उगवण क्षमता 80 टक्के असुन त्याप्रमाणे भुखंडाना भेटी व तपासणी केल्याचे व शेतक-यांना किती फायदा झाला? याबाबत फलश्रृती अहवाल विभागाने तयार करुन सह आयुक्त पशुसंवर्धन यांना पाठवल्याचे आढळत नाही.

**3.718 जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजने अंतर्गत आदिवासी व अनुसुचित जाती उपयोजने अंतर्गत लाभार्थींना 75 टक्के अनुदानावर शेळयांचे गट वाटप योजने मधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5 व 6) -** याबाबत रक्कम रूपये 1,07,21,456/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्तीय वर्षाचे अखेरीस कोणताही अग्रीम मंजुर करणे व प्रदान करणे निर्बंध असतांनाही वरीलप्रमाणे दिनांक 13/07/2015 ला रुपये 8,25,375/- व अनुसुचित जाती उपयोजने अंतर्गत दिनांक 03/03/2016 ला रुपये 91,76,192/- चा अग्रीम प्रदान करण्यात आला आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) अग्रीमाची रक्कम रुपये 8,25,375/- व्यवस्थापक अहील्याबाई होळकर मेंढी व शेळी विकास महामंडळ प्रक्षेत्र पोहरा तालुका जिल्हा अमरावती यांचे नावे देण्यात आला. या देयकातुन बजाज अलायन्स जनरल इन्सुरन्स यांची विमा रक्कम रुपये 49,128/- व्यवस्थापक अहिल्यादेवी होळकर प्रक्षेत्र, पोहरा यांना प्रदान केल्याचे प्रयोजन स्पष्ट करण्यात यावे. (परिच्छेद क्रमांक 5)

3) सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थीना एक दिवसाचे प्रशिक्षण देण्यात यावे. मात्र त्या प्रकारची कार्यवाही विभागामार्फत करण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

4) मार्गदर्शक सूचनेनुसार सदर योजनेचे उपयोगीता प्रमाणपत्रे पुढील वर्षाच्या माहे एप्रिल महिन्यात सादर करण्यात यावे. मात्र विभागामार्फत तशी कार्यवाही झाल्याचे अभिलेख्यांन अभावी पडताळणी करता येत नाही. तसेच सदर योजनांचा मुल्यमापन अहवाल शासनास सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

5) विभागामार्फत सदर योजना यापुर्वी सुध्दा नियमित राबविण्यात आली असल्याने सदर योजनेचे मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशा प्रकारचे मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नसल्याने सदर योजनेचा लाभ एकाच लाभार्थ्यांस दोनदा दिल्या गेल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) 25 टक्के लाभार्थी हिस्सा डिडि नंबर 156676 दिनांक 04/03/2016 नुसार रुपये 2,58,635/- सदर रक्कम लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची असलेबाबत लाभार्थी हिस्सा भरल्याचे लाभार्थ्यांना लाभ दिल्याची खात्री करता येत नाही. (परिच्छेद क्रमांक 5)

7) सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना अनुक्रमांक 7 नुसार लाभार्थी यादी जिल्हाधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाचे सूचना फलकावर उपलब्ध केल्याचे आढळत नाही. अट क्रमांक 12 नुसार शेळी संगोपनासाठी लाभार्थीकडे पुरेशी जागा उपलब्ध असल्याचे अभिलेखे आढळत नाही.

8) शासन निर्णय दिनांक 11/11/2011 चे अट क्रमांक 18 नुसार लाभार्थीस हा व्यवसाय 3 वर्ष करणे आवश्यक आहे. लाभार्थीना दिलेल्या शासकीय अनुदानाचा दुरविनियोग केल्यास अनुदानाची रक्कम व्याजासह एक रक्कमी वसुली करावयाची आहे. परंतु, अट क्रमांक 20 नुसार पशुपालकाच्या घरी जावुन 100 टक्के पडताळणी करुन त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्या मार्फत वरील कार्यालयास सादर करावा. तसे केल्याचे अभिलेख्यावरुन आढळत नाही. त्यामुळे सदर बाबतची पडताळणी करता आली नाही.

9) शासन आदेश क्रमांक 323 दिनांक 11/11/2011 अनुक्रमांक 21 आक्षेप क्रमांक 12 पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या एकूण शेळी गटाच्या 25 टक्के गटांची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हयात फिरतीच्या वेळी वाटप केलेल्या एकूण शेळी गटांपैकी 10 टक्के शेळी गटांची अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करावा.

10) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक निवायो 2011/प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 नुसार योजनेचे स्वरुप दिले असुन स्थानिक जातीच्या 10 शेळया खरेदीस रुपये 40,000/- + बोकड रुपये 500/- व रुपये 2,848/- विमा तीन वर्षासाठी एकूण रुपये 47,848/- रक्कम ठरली असुन योजन 75 टक्के अनुदानावर असल्याने रुपये 11,962/- लाभार्थी हिस्सा व शासकीय अनुदान 35,886/- दिले आहे. चलनाद्वारे 25 टक्के रक्कम जमा केल्याचे नस्ती आढळते. (परिच्छेद क्रमांक 6)

### 3.719 75 टक्के अनुदानावर आदिवासी उपयोजने अंतर्गत आदिवासी व अनुसुचित जाती / नवबौध्द लाभार्थीना दुधाळ जनावराचे गट वाटप करणेबाबत.

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12 व 13) -** याबाबत रक्कम रूपये 1,21,85,036/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या योजने अंतर्गत 75 टक्के म्हणजेच रुपये 63,796/- शासकीय अनुदान अनुज्ञेय असुन 25 टक्के रक्कम स्वत: उभारावी लागेल. सदर 25टक्के लाभार्थी हिस्सा भरण्याबाबत कोणतीही अभिलेखे प्राप्त झालेले नाही.

2) योजनेचे मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले नाही.

3) प्रमाणकासह खरेदी विक्री संस्थेच्या जनावर घेतल्याच्या पावत्या जोडल्या असून पशुवैद्यकिय अधिकाऱ्याचा सध्या दुध देत असल्याचा दाखला जोडण्यात आलेला नाही.

4) शासन निर्णय दिनांक 22/11/2011 चे सुचना क्रमांक 17 नुसार योजना राबवितांना प्रथम 1 जनावर वाटप करावे. सदर जनावर आटल्यानंतर दुसरे दुधाळ जनावर वाटप करावे. उपरोक्त दोन्ही देयकावर प्रथम जनावर वाटप आहे, की दुसरे? याबाबत कोणतीही नोंद नाही.

5) सदर रक्कमा अग्रीमाद्वारे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे नावे असुन सदर रक्कमा लाभार्थ्यांस कशा प्रदान केल्या? पोच पावत्या आढळल्या नाहीत.

6) लाभार्थी निवड समितीने निवड केल्याचे लाभार्थी यादी तसेच त्याचा अहवाल लेखापरीक्षणास सादर केली नाही.

7) सुचना क्रमांक 13 नुसार दुभत्या जनावराची खरेदी शक्यतो राज्याबाहेरील नामांकित पशुच्या बाजारातुन करण्यात यावी. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळत नाही.

8) विमा पॉलीसी अदयाप अप्राप्त असुन जनावर मृत झाल्यास शासकीय निधीची हानी होऊ शकते.

9) योजनेमुळे किती उत्पादन वाढले योजनेचा फलश्रृती अहवाल जोडला नाही. उपरोक्त नस्ती उपलब्ध करुन शासन निर्णयानुसार योजना राबविण्याचे दर्शवावे. तो पर्यंत सदर योजनेवरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

10) शासन निर्णय दिनांक 22/11/2011 चे सूचना क्रमांक 10 नुसार सदर ची योजन शक्यतो क्लस्टर स्वरुपात आणि अस्थित्वातील / प्रस्तावित दुध संकलन मार्गावरील गावामध्ये राबविण्यात यावी. त्याप्रमाणे योजना राबविण्याचे आढळत नाही.

11) सदर शासन निर्णय सूचना क्रमांक 11 नुसार या योजने मध्ये एच एफ जर्सी या 10 ते 12 लिटर प्रति दिन दुध उत्पादन असलेल्या सुधारीत गावी तसेच मुऱ्हा व जाफरा नादी य 8 ते 10 लिटर प्रतिदिन दुध् उत्पादन असलेल्या सुधारीत जातीच्या म्हशी, दुसऱ्या / तिसऱ्या वेतातील 15 ते 30 दिवसापुर्वी व्यालेल्या संकरीत गायी / म्हशी चे वाटप करण्यात यावे. याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळत नाही.

12) शासन निर्णय दिनांक 20/11/2011 च्या सुचना क्रमांक 19 प्रमाणे संबंधीत पशुवैद्यकिय संस्थेद्वारे सदर दुधाळ जनावरांच्या आरोग्य विषयक अळी पैदाशीच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात व त्याची नोंद स्वातंत्र नोंदवहीमध्ये घेण्यात यावी. यामध्ये जनावरातुन मिळालेले वेतनातील दुध उत्पादन, माज दाखविल्याचा दिनांक, कुत्रिम रेवनाचा दिनांक, गर्भ तपासणीचा दिनांक व निष्कर्ष गाव / म्हैस व्याल्याचा दिनांक, नर / मादी, वासरु जन्मास वासराचे वजन इत्यादी बाबीचा समावेश असावा. याबाबतच्या नोंदवहीचा नमुना आयुक्त पशुसंवर्धन यांनी सर्व कार्यान्वयन अधिकाऱ्यांना परिपत्रीत करावा. तसेच सदर अधिकारी / कर्मचाऱ्यामार्फत दर तिमाहीस वटप केलेल्या दुधाळ जनावरांची पशुपालकांचा घरी जाऊन 100 टक्के पडताळणी करण्यात यावी व त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्यामार्फत वरिष्ठास सादर करण्यात यावा. याप्रमाणे पडताळणी करणे आवश्यक असता करण्यात आली नाही.

13) शासन निर्णय दिनांक 22/11/2011 चा सुचना क्रमांक 20 प्रमाणे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावराची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठास सादर करावा. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

14) शासन निर्णय दिनांक 22/11/2011 चा सुचना क्रमांक 24 प्रमाने सदर योजने अंतर्गत लाभार्थ्यांना दिलेल्या शासकीय अनुदानचा गैरविनियोग केल्याचे निदर्शनास आल्यास अनुदानाची व्याजासह एक रक्कमी वसुली महसुली कार्यपध्दतीने लाभार्थीकडुन करण्यात यावी. तसेच अशा लाभार्थीस कुटुंबास शासनाच्या इतर विभागाच्या कोणत्याही विशेष घटक आदिवासी क्षेत्र/ आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना अंतर्गत पुढील 5 वर्षासाठी लाभ देण्यात येऊ नये. याप्रमाणे पडताळणा करणे आवश्यक असता केली नाही.

15) शासन निर्णय दिनांक 22/11/2011 चा सुचना क्रमांक 27 प्रमाणे लाभार्थ्यांकडे 02 दुधाळ जनावराचे पालन करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असल्याची तपासणी करण्यात आले नाही. तसेच सूचना क्रमांक 28 प्रमाणे लाभार्थांना दुग्ध व्यवसाय / गाय / म्हैस पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक असताना प्रशिक्षण दिले नाही.

**3.720 पशुवैदयकिय संस्थाची सुधारणा आधुनिकिकरण व बळकटीकरण योजने अंतर्गत इमारत बांधकाम अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,00,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी तथा सदस्य् सचिव, जिल्हा नियोजन समिती, वाशिम यांचे पत्र जावक क्रमांक नियोजन /कक्ष-15/जिवायो/15-16/612, दिनांक 23/06/2015 अन्वये रुपये 90,00,000/- निधी प्राप्त् झाले आहे तर जावक क्रमांक नियोजन/कक्ष-15/जिवायो/15-16/53, दिनांक 16/01/2016 अन्वये रुपये 10,00,000/- जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण योजना) अंतर्गत निधी प्राप्त् झाला. सदर निधी या ठिकाणी पत्र क्रमांक जिपवा/पशुसंवि/तांत्रिक/ कावि/339/2016, दिनांक 23/03/2016 अन्वये कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद वाशिम यांना रुपये 1,00,00,000/- निधी वितरत करणेत आला आहे.

2) सदरची तरतुद निधी वितरीत करतांना त्यामधुन बांधकाम विभागामार्फत कोणती कामे करावयाची आहेत किंवा सदर निधी कोणत्या कामावर खर्च करावयाचा याबाबत स्पष्ट निर्देश नसतांना केवळ प्राप्त् झालेला संपुर्ण निधी बांधकाम विभागास वितरीत करण्यात आल्याचे आढळुन आले. अशा प्रकारे बांधकाम विभागास वितरीत करणेत आलेल्या निधीचे मंजुर नियतव्ययाच्या अनुषंगाने स्पीलओव्हरची कामे प्रलंबित / अपुर्ण आहेत किंवा कसे? याबाबत विभागाकडे सविस्तर नोंद आढळुन आल्या नाहीत.

3) पशुसंवर्धन विभागातील अभिलेख्यानुसार सन 2015-2016 या वित्तीय वर्षात प्रशासकिय मान्यता आदेश क्रमांक जिपवा/पशुसंवि/आस्था/कावि/337/2016, दिनांक 23/03/2016 अन्वये एकुण 5 कामांना मान्यता देण्यात आली. तसेच जिल्हा परिषद सर्वसाधारण ठराव क्रमांक 6(5) दिनांक 14/08/2015 रोजीचे सभेत मान्यता देणेत आली आहे.

सन 2015-2016 मध्ये प्राप्त् व वितरीत निधीला प्रशासकिय व तांत्रिक मान्यता देणेत आली. उपरोक्त् मंजुर कामापैकी किती बांधकामांना सुरवात झाली? याची माहिती विभागाकडे उपलब्ध् नाही. यावरुन प्राप्त् तरतुदी निधी विहीत कालमर्यादेत उपयोगात आणल्या गेलेल्या नसल्याचे दिसुन येते. तसेच शासनाकडुन प्राप्त् अनुदानाचे योग्य नियोजन न करताच संपुर्ण निधी एकत्रित बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे व त्यानंतर सदर निधीच्या विनियोजनाबाबत कोणताही पाठपुरावा केल्याचे अभिलेखे उपलब्ध नाहीत.

4) वरील सादर 5 इमारतीची तपासणी करुन सदर इमारती दुरुस्ती होण्याजोग्या आहेत किंवा पाडुन त्या ठिकाणी नवीन इमारत बांधणे आवश्यक आहे, असे स्पष्ट् प्रमाणपत्र विभागांच नस्तीस उपलब्ध् झाले नाही. त्यामुळे तसे प्रमाणपत्र प्राप्त् न करताच इमारत बांधकामास सार्वजनिक बांधकाम विभागाने तांत्रिक मान्यता दिली. तसेच त्याकामी लागणा-या जागेची उपलब्धता, जागेचा नकाशा संबंधीत कागदपत्रे नस्तीस सादर केलेले नाही. त्यामुळे सदरच्या इमारती नवीन बांधणे आवश्यक होते काय? याबाबत सप्रमाण अहवाल सादर करावा.

5) सदर पशुवैदयकिय दवाखाने बांधकाम सुरु केलेबाबत कार्यारंभ आदेश बांधकामे पुर्ण झाले, याबाबत पुर्णत्व़ प्रमाणपत्र व इमारत हस्तातरण व रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणापावेतो नस्तीस सादर केलेले नाही. तसेच सदर पशुवैदयकिय दवाखाने इमारत बांधकाम ठेकेदार सोबत केलेल्या बांधकामाचे करारनाम्याची प्रत नस्तीला आढळुन आले नाही.

**3.721 कामधेनु दत्तक ग्राम योजने अंतर्गत सन 2014-2015 च्या अखर्चित निधीतुन औषध खरेदी करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत रक्कम रूपये 23,20,571/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 मध्ये पशुसंवर्धन विभागामध्ये विशेष घटक योजने अंतर्गत कामधेनु दत्तक ग्राम योजना करीता प्राप्त झालेल्या निधीतुन अखर्चित राहीलेला निधी सन 2015-2016 मध्ये खर्च करण्याकरीता अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचे आदेश क्रमांक 625/2015, दिनांक 19/06/2015 अन्वये मंजुरी दिली आहे. सन 2014-2015 अखेर रुपये 23,53,654/- एवढी अखर्चित निधी शिल्लक असुन त्यामधुन रुपये 23,20,468/- माहे मार्च 2016 अखेर खर्च करण्यात आला व रुपये 33,186/- शिल्लक राहीलेला आहे. सदरचा अखर्चित निधी शासनास परत करणे आवश्यक असतांना करण्यात आला नाही. याबाबत योग्य तो खुलासा करावा.

2) अतिरीक्त आयुक्त अमरावती यांचे पत्र क्रमांक 88/2014 दिनांक 14/01/2016 मधील अट क्रमांक 6 नुसार रुपये 5000 पेक्षा जास्त किमतीच्या खरेदी केलेल्या औषधीची गुणवत्ता अन्न् व औषधी प्रशासनाकडील मान्यता प्रात प्रयोग शाळेतुन तपासणी करण्याचे आदेश आहेत. चाचणी अहवाल प्राप्त केल्यानंतर रक्कमेचे शोधन करावयास पाहीजे. परंतु, माल प्राप्त् दिनांक 24/05/2015 असंताना औषधी गुणवत्ता चाचणी अहवाल दिनांक 15/04/2015 ला घेण्यात आला. याबाबत खुलासा करावा.

3) अखर्चित अनुदान खर्च करण्यास अतिरीक्त् मुख्य् कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी आदेश क्रमांक 625/2015-16, दिनांक 19/06/2015 ला दिली असता जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचा औषधी पुरवठा आदेश दिनांक 09/03/2015 ला दिल्याचे आढळुन आले आहे. म्हणजेच अनुदान खर्च मंजुरी आदेशापुर्वीच पुरवठा आदेश दिल्याचे स्पष्ट होते.

4) सदर योजने अंतर्गत औषधी पुरवठा करणे बाबत पंचायत समिती, मंगरुळपीर, कारंजा, मानोरा, मालेगाव, वाशिम व रिसोड येथे पशसंवर्धन विकास अधिकारी यांचे मागणीपत्र नस्तीला आहेत. परंतु, सदर मागणीपत्राची तपासणी केली असता, त्यावर आवक क्रमांक दिनांक नमुद नाहीत. तसेच औषधीची मागणी मोघम स्वरुपात केल्याचे आढळुन आले आहे.

**3.722 50 टक्के अनुदानावर तलंगा गट पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय जिवायो 2010 / प्रक 312 /पदूम-4 दिनांक 16/09/2010 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 1 नुसार कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्याचे यावा, असे नमुद आहे. मास्टर नोंदवहीची प्रत नस्तीस जोडलेली नसल्याने एकाच कुटुंबात दुबार लाभ देण्यात आला किंवा कसे, याबाबत खात्री पटली नाही.

2) शासन निर्णयातील सुचना क्रमांक 7 व 10 नुसार लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारण्यासाठी 30 दिवसांची मुदत देण्यात यावी. दिनांक 30 डिसेंबर नंतर अर्ज स्वाकारू नये. तसेच योजनेचे अर्ज जिल्हा निवड समीतीकडे पाठविण्याची अंतीम तारीख ही 15 जानेवारी नमुद आहे. परंतु, विभागाने प्रकीयेला उशीरा सुरुवात करून प्रशासकीय मंजुरी/ तांत्रीक मंजुरी/ पुरवठा आदेश इत्यादी दिनांक 30/09/2015 व 11/02/2016 ला दिलेत. त्यामुळे निवड प्रकीया योग्य राबबिल्या गेल्या नाहीत. तसेच अर्ज आवकला घेतले नाही. करीता कधी प्राप्त झाले? याबाबत खात्री पटत नाही.

3) उपरोक्त शासन निर्णयातील मुददा क्रमांक 7 नुसार लाभर्थी निवड समिती स्थापन करण्यात येईल. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दस्ताऐवज नस्तीस उपलब्ध झाले नाही. तसेच ज्या जिल्हयात मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र किंवा सघन कुक्कुट विकास गट नाहीत. अशा ठिकाणी नजिकच्या मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र किंवा सघन कुक्कुट विकास गटाच्या अधिकाऱ्याचा समितीमध्ये सदस्य म्हणुन समावेश करण्यात यावा. परंतु, समिती गठीत केली नाही व शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच निवड यादीवर दिनांक नमुद नसल्याने जिल्हा निवड समीतीने योजनेची लाभार्थ्याची निवड यादी मंजुर / प्रसिध्द कधी केली गेली? याची सत्यता पडताळता आली नाही.

4) उपरोक्त शासन निर्णयातील मुददा क्रमांक 10 नुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांना क्रमांक जिपवा/पशु/ता/कावि/718/2016, दिनांक 17/05/2016 नुसार अग्रीम धनादेश पाठविण्यात आला. धनादेश क्रमांक 0277681/31/03/2016 यावरुन धनादेश विलंबाने देण्यात आला. परंतु, विहित कालावधीत तलंगा गट उपलब्ध् करुन देण्याची जबाबदारी संबंधित पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांची असतांना त्यांनी लेखापरिक्षण कालावधीपर्यंत पंचायत समिती, मालेगाव यांना तलंगा गट पुरविले नाही. अग्रीम रककम देवुनही विहित कालावधीत लाभ दिला नाही. करीता रक्कमेचा अपव्यय झाला. त्याबाबत खुलासा करावा लाभार्थींना त्याच आर्थिक वर्षात लाभ मिळाला नाही.

5) साबिक दानीश अली पटेल रा. अंबाडा पंचायत समिती मोर्शी यांनी गाडीने तंलगा गट पुरविलेबाबत नमुद आहे. परंतु, जिल्हा पशुसंर्वधन अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी उपरोकत पुरवठादारस पुरवठा आदेश दिल्याबाबत कोणतेही दस्ताऐवज लेखापरिक्षणास किंवा डिलेव्हरी चलान लेखापरिक्षणास उपलब्ध् झाले नाही.

6) निवड केलेल्या लाभार्थीना लाभ न देता प्रतिक्षा यादीतील लाभार्थींना लाभ देण्यात आला.

7) उपरोक्त शासन निर्णयातील बाब क्रमांक 20 अन्वये या योजनेमध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या गटापासुन मिळणाऱ्या उत्पन्नाचे अभिलेखे ठेवावेत, असे नमुद असतांना त्याप्रमाणे अभिलेखे ठेवले नाहीत. तसेच फलश्रुती अहवालसुध्दा लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाहीत.

8) पंचायत समिती, रिसोड चे तलंगा गट प्राप्त झाल्याबाबतचे दस्ताऐवज नस्तीस उपलब्ध् झाले नाही. करीता तंलगा गट प्राप्त झाले किंवा नाही, याची शहानिशा करता आली नाही.

**3.723 75 टक्के अनुदानावर शेळी प्रजननासाठी उत्तम प्रतिचा बोकड पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 13,57,620/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त विभाग, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ठ ई मध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार सेस फंडातील योजना राबविणे आवश्यक असतांना राबविण्यात आली नाही.

2) मार्च महिण्यात अग्रीम देता येत नसतांना वरील प्रमाणे मार्च महिण्यात मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी मार्च महिण्यात अग्रीम दिल्याचे निदर्शनास येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1084/सीआर-1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थ्यांकडून मागविलेल्या अर्जाची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांची यादी पंचायत समितीच्या मासिक सभेत मान्यता घेऊन लाभार्थ्यांकडून लोक वर्गणीची रक्कम जमा करणे आवश्यक असतांना लाभार्थ्यांना बोकडचा लाभ दिल्यानंतर लोकवर्गणीची रक्कम रोख स्वरुपात घेण्यात आली.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-10.2014/ 18103/प्र.क्र.367/मदुम-4, दिनांक 05/10/2014 अन्वये पशुधन विकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांच्या घरी जाऊन जनावरांची तपासणी करुन तपासणी अहवाल नस्तीला जोडणे आवश्याक असतांना नस्तीला जोडण्यात आलेला नाही.

5) व्यवसायीक दृष्ट्रीकोणातून उच्च प्रतिच्या शेळया बोकड पैदास करणे व आर्थिक उत्पन्नामध्ये भर घालणे हा उद्देश उस्मानाबादी बोकड खरेदी मागील असून प्रत्यक्ष किती लाभार्थ्यांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर पडली परिस्थिती सुधारणा झाली याबाबत माहिती व आकडेवारी नस्तीला जोडण्यात आली नाही.

6) पंचायत समिती यवतमाळ पांढरकवडा व दिग्रस येथील लाभार्थ्यांना बोकडचा पुरवठा करण्याकरिता जा.क्र.448/31.3.2016 अन्वये दिलेल्या पुरवठा आदेशरानुसार दिनांक 31/03/2016 ला बोकडचा पुरवठा केल्याचे दाखवून त्याच तारखेला पुरवठाधारकाला पेमेंट करण्यात आले.त्यामुहे सदहू व्यवहार संशयास्पद वाटते.

7) पंचायत समिती दारव्हा व पंचायत समिती पांढरकवडा अंतर्गत लाभार्थ्यांचे अर्ज उपलब्ध झाले नाही.

8) दिनांक 31/03/2016 पर्यंत लोकवर्गणीची रक्कम जमा झालेली नसतांना फर्गच्या नावे लोकवर्गणीची रक्कम देण्याकरिता दिनांक 31/03/2016 ला नोटशीट टाकल्याचे व मंजूर केल्याचे निदर्शनास येते.

9) एकूण 269 पैकी 222 बोकडची लोकवर्गणीची रक्कम फर्म ला पाठविण्यात आली परंतू उर्वरीत 37 बोकडची रक्कम रुपये 64750 पाठविण्यात आली नाही.

**3.724 एकात्मीक कुक्कुट विकास योजने अंतर्गत 50 टक्के अनुदानावर तलंगा खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 4,17,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्याच्या घेललेल्या अर्जाची पडताळणी केली असता अर्जावर कार्यालयीन आवक क्रमांक नमुद नसल्यामुळे लाभार्थ्यांकडून कधी अर्ज घेण्यात आले याची सत्यता पडताळता आली नाही.

2) गांव सोडून गेलेल्या 5 लाभार्थ्यांच्या नावे धनाकर्ष काढण्यात आल्याचे निदर्शनास येते.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुगधव्यवसाय विकास व मस्त्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2010/प्र.क्र.312/पदुम 4, दिनांक 16/09/2010 नुसार योजना राबविण्याकरिता शासनाकडून जेवढे अनुदान प्राप्त झाले त्याप्रमाणात लाभार्थ्यांकडून अर्ज मागवून लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असतांना आवश्यकते पेक्षा जास्त लाभार्थ्सींची निवड केल्याचे निदर्शनास येते.

4) ज्या लाभार्थ्यांना तलंगा चा लाभ देण्यात आला ते लाभार्थी महाराष्ट्र शासन, कृषी, पशु, दुग्ध व्यवसाय विकास व मस्त्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जि वा यो/2011/प्र.क्र.305/पदुम 4, दिनांक 22/11/2011 अन्वये योजनेच्या मार्गदर्शक सुचने नुसार व्यवस्थीत पक्षांचे संगोपन करते किंवा नाही.याबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 10/2014/18103/ प्र.क्र.367/पदुम 4, दिनांक 05/10/2014 नुसार पशुधन अधिकारी यांनी प्रत्यक्ष स्पॉट वर जाऊन तपासणी केल्याबाबत अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

5) ज्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला त्या लाभार्थ्यांच्या आर्थिक उत्पन्नात भर पडल्याबाबतचा अहवाल लेखापरिखणास उपलब्ध न झाल्यामुळे शासनाचा योजनामागील उददेश सफल झालेला नाही.

6) दुबारा लाभ देण्यात येऊ नये याकरिता महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांकमागास 1059/प्र.क्र.557/34, दिनांक 05/10/1989 अन्वये ठेवणे आवश्यक असतांना मास्टर रजिष्टर ठेवण्यात आले नाही.

**3.725 एकात्मीक कुक्कुट विकास योजने अंतर्गत 50 टक्के अनुदानावर एक दिवशीय पिले खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमितताबाबत**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,72,650/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्याच्या घेललेल्या अर्जाची पडताळणी केली असता अर्जावर कार्यालयीन आवक क्रमांक नमुद नसल्यामुळे लाभार्थ्यांकडून कधी अर्ज घेण्यात आले याची सत्यता पडताळता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2010/प्र.क्र.312/पदुम 4, दिनांक 16/09/2010 नुसार योजना राबविण्याकरिता शासनाकडून जेवढे अनुदान प्राप्त झाले त्या प्रमाणात लाभार्थ्यांकडून अर्ज मागवून लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असतांना आवश्यकते पेक्षा जास्त लाभार्थ्यांची निवड केल्याचे निदर्शनास येते.

3) ज्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला ते लाभार्थी महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मस्त्स व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो/2011/प्र.क्र.305/पदुम 4, दिनांक 22/11/2011 अन्वये योजनेच्या मार्गदर्शक सुचने नुसार व्यवस्थित पक्षांचे संगोपन करते किंवा नाही. याबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 10/2014/18103/प्र.क्र.367/ पदुम 4, दिनांक

05/10/2014 नुसार पशुधन अधिकारी यांनी प्रत्यक्ष स्पॉट वर जाऊन तपासणी केल्याबाबत अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

4) ज्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यामत आला त्या लाभार्थ्यांच्या आर्थिक उत्पन्नात भर पडल्याबाबतचा अहवाल लेखापरिखणास उपलब्ध न झाल्यामुळे शासनाचा योजनामागील उद्देश सफल झालेला नाही.

5) दुबारा देण्यात येऊ नये याकरिता महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास 1059/प्र.क्र.557/34, दिनांक 05/10/1989 अन्वये ठेवणे आवश्यक असतांना मास्टर रजिष्टर ठेवण्यात आले नाही.

6) विमा काढल्याबाबत विमाचे कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

**3.726 100 टक्के अनुदानावर दुधाळ जनावराकरिता खाद्य उपलब्धतेसाठी सुधार कार्यक्रमावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,98,366/- खर्च करण्यात आला आहे. सदर योजनाअंतर्गत लाभार्थ्यांना रूपये 600/- पर्यंत वैरणीचे ठोंबे / बियाने पुरवठा करावयाचा आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना पत्र क्रमांक 1813-85, दिनांक 09/06/2015 अन्वये योजना राबविण्यात आली नाही.

2) दुभत्या जनावरांकरिता खाद्य उपलब्धतेबाबत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी पंचायत समितीनिहाय दिनांक 17/11/2015 ला लाभार्थ्याची निवड यादीस मंजुरी प्रदान केली असतांना पंचायत समिती स्तरावर मंजुर यादीपेक्षा 358 लाभार्थीस मंजुरी नसतांना नियमबाह्य लाभ दिलेली कमीत कमी प्रतिलाभार्थी 10 किलो मक्का रुपये 46/- प्रमाणे एकुण रुपये 460/- प्रमाणे रुपये 1,64,680/- संबंधीत पशुसंवर्धन अधिकाऱ्याकडून वसुलपात्र ठरते

3) निवड झालेल्या लाभार्थीकडे जनावरे आहे किंवा नाही याबाबत यादी सादर करण्यात आली नाही.

**3.727 पशुवैद्यकीय संस्थांना जिवनरक्षक औषधाचा पुरवठ्यावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2015-2016 मध्ये पशुवैद्यकीय संस्थांना जिवनरक्षण औषधी पुरवठा करणे जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत येणारी गावे व जिल्हातील इतर सर्व गावातील आदिवासीच्या जनावरांना विनामुल्य औषधी वितरीत करून पुरवठादारांस रक्कम रूपये 9,99,981/- अदा करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) (अ) महाराष्ट्र शासन, दरकरार पत्र क्रमांक 326/1352/2014 पसं 12, दिनांक 31/12/2014 अतिरिक्त आयुक्त, पुणे यांचे पत्रानुसार मागणीचे 60 दिवसाचे आत पुरवठादाराने औषधाचा पुरवठा न केल्यास एकुण किंमतीचे 0.5 टक्के दराने दंडाची प्रती आठवडा वसुली करावी. असे असतांना नंदीनी मेडीकल लेबॉटरीज प्रा.लि. इंदोर यांचेकडून 18 दिवसाचे रूपये 5,126/- दंडाची रक्कम वसुल केलेली नाही.

(ब) तसेच मारवेल लेबॉटरीज प्रा.लि. मेहसना यांनी औषधी एकुण 12 दिवस उशिरा पोहोच केलेल्या आहे. दरकरारातील अट क्रमांक 12 नुसार 12 दिवसाचे रूपये 321/- वसुलपात्र ठरते.

2) औषधी साठा नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवहीत बिलानुसार औषधाच्या नोंदी घेतल्या असुन औषधी पंचायत समिती स्तरावर वाटप दाखविले असुन औषध प्राप्त व वाटपाबाबत दिनांक नमुद नाही यावरून औषधी आर्थिक वर्षात वाटपाबाबत खात्री होत नाही.

3) प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन, नागपूर यांचे पत्र क्रमांक 7319, दिनांक 08/12/2015 नुसार औषधी खरेदीनंतर संबंधीत शासन निर्णयानुसार औषधाची गुणवत्ता तपासणीबाबत व विनियोगाबाबत कार्यवाही करावी. परंतु खरेदीनंतर औषधाची गुणवत्ता तपासणी अहवाल नाही.

**3.728 100 टक्के अनुदानावर देशी / गवळावू वळुंचा पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा चे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात लेखापरीक्षण करिता असतांना जिल्हा परिषद सेस फंडातून 100 टक्के अनुदानावर देशी / गवळावु वळुंचा पुरवठा करणेबाबत योजना राबवितांना 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,67,489/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 (सुधारित 2011) नियम 150 नुसार तांत्रिक मान्यता व 151 नुसार प्रशासकीय मान्यता अशी वेगवेगळे मंजूरी आदेश निर्गमीत करणे आवश्यक असतांना उपरोक्त प्रमाणे एकाच आदेशात प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतलेली आहे.

2) या योजनेबाबत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांनी अ.क्र.3 योजना राबविण्याची पध्दत मध्ये (ब) नुसार नमुद केल्याप्रमाणे रुपये 20,000/- च्या मर्यादेत वळुंची खरेदी करणे बंधनकारक असतांना 03 विक्रेत्यांकडून रुपये 45,000/-, रुपये 40,000/- व रुपये 45,000/- असे एकुण रुपये 1,30,000/- मध्ये वळु खरेदी करण्यात आले आहे. यामुळे अतिरीक्त प्रदान करण्यात आलेली रक्कम रुपये 70,000/- लेखापरिक्षणास मान्य करता येत नाही. त्यामुळे सदर रक्कम वसुल करुन जिल्हा परिषद सेस फंडात जमा करण्यात यावे.

3) वळुंचे विमा काढल्याचे विमा पावती लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

4) करारनाम्यासोबत जोडलेल्या वळुंच्या छायाचित्रात टॅग क्रमांक व दिनांक नमुद नाही.

5) लाभार्थ्यांनी केलेल्या करारनाम्यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर करारनामा वैध आहे, असे म्हणता येत नाही.

6) जिल्हयातील दुग्ध व्यवसायाला चालना देण्याकरीता देशी / गवळावु वळुंचा पुरवठा करुन देशी गोवंश टिकविणे, देशी / गवळावु जातीचे संगोपन व व्यवस्थाप करणे, झपाट्याने कमी होत चालेलेली जिल्हयातील गवळावु जनावरांची संख्या वाढविणे हे या योजनेचे उद्दिष्टे आहे. परंतु महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1982 नुसार योजनेचे उद्दिष्ट सफल झालेबाबतचे फलश्रृती अहवाल नस्तीत आढळले नसल्यामुळे सदर उद्दिष्टे पूर्ण झाले किंवा नाही ही बाब लेखापरीक्षणास तपासता आली नाही.

7) वळू वाटपाकरिता लाभार्थी निवडीबाबत लाभार्थी अर्ज लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

8) पशुसंवर्धन व दुग्धशाळा विषय समिती जिल्हा परिषद वर्धा यांनी 51 लाभार्थ्यापैकी 11 लाभार्थ्यांची निवड केली असतांनाही 8 लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला. तरतूद असतांनाही उर्वरित लाभार्थी व प्रतिक्षा यादीतील लाभार्थी यांना लाभ न देता रुपये 92,511/- इतका निधी अखर्चित ठेवण्यात आला. यावरुन या योजनेबाबत तसेच उद्दिष्टांबाबत उदासिनता असल्याचे दिसून येते.

**3.729 पशुवैद्यकीय संस्थाचे बळकटीकरण व आधुनिकीकरण (ESVHD) अंतर्गत फर्निचर, उपकरणे इत्यादी साहित्य खरेदी करणेबाबत. (केंद्र शासन 75 टक्के व राज्य शासन 25 टक्के निधी)**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा चे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात लेखापरीक्षणकरित असतांना सन 2014-15 मधील अखर्चित शासकिय निधीतून पशुवैद्यकीय संस्थाचे बळकटीकरण व आधुनिकीकरण (ESVHD) अंतर्गत फर्निचर, उपकरणे इत्यादी साहित्य खरेदी करणेबाबत प्रमाणक क्रमांक 3341, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 4,84,000/- खर्च केला आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-1002/प्र.क्र.1281/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 च्या अधिन राहून 2014-15 ची अखर्चित निधी 2015-16 या वित्तीय वर्षात खर्च करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 (सुधारित 2011) नियम 150 व 151 नुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतल्याचे मंजूरी आदेश नस्तीत आढळली नाही.

2) प्रत्यक्षात सन 2014-15 मध्ये रुपये 5,00,000/- निधी अखर्चित असतांनाही पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद वर्धाद्वारे आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांना सर्व निधी सन 2014-15 मध्ये खर्च झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करुण शासनाची दिशाभूल केल्याचे मत असून याबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

3) सन 2015-16 मध्ये प्रत्यक्षात रुपये 4,84,000/- खर्च करण्यात येऊन रुपये 16,000/- शिल्लक निधी आहे. परंतु विभागाद्वारे सन 2014-15 मध्येच संपूर्ण रुपये 5,00,000/- निधी खर्च झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त यांना सादर केले आहे. या तफावतीबाबत विभागाचा अभिप्राय आवश्यक आहे.

4) निधी खर्च झाल्याचे उपयोगीता प्रमाणपत्र महालेखापाल यांना सादर केल्याचे व त्यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र निकाली काढल्याचे पत्र प्राप्त करुन घेणेची जबाबदारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांची असतांना तसे पत्र नस्तीत आढळले नसल्यामुळे याप्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2015/प्र.क्र.28/2015/विनियम, दिनांक 25/06/2015 नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद 3 नुसार मे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, नागपूर शाखा वर्धाद्वारे कळविण्यात आलेले साहित्याचे दर बाजारभावाशी पडताळून ते योग्य असल्याचे खरेदी समितीने प्रमाणित करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे खरेदी समितीने कार्यवाही केल्याचे आढळले नाही.

**3.730 100 टक्के केंद्र पुरस्कृत लाळ्याखुरकत रोगाचे नियंत्रण आणि रोगमुक्त पट्टा निर्माण करणे (FMDCP योजना)**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** लाळ्याखुरकत रोगाचे नियंत्रण आणि रोगमुक्त पट्टा निर्माण करणे (FMDCP योजना) बाबत 10 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 6,47,336/- खर्च केला आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-1002/प्र.क्र.1281/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 च्या अधिन राहून 2014-15 ची अखर्चित निधी 2015-16 या वित्तीय वर्षात खर्च करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 (सुधारित 2011) नियम 150 व 151 नुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतल्याचे मंजूरी आदेश नस्तीत आढळली नाही. यावरुन चालु वित्तीय वर्षात राबविण्यात आलेल्या या योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आले नाही.

2) पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा पत्र क्रमांक जिपव/जिपसंअ/तां/3603/2015, दिनांक 15/12/2015 नुसार प्रादेशीक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांना पाठविलेल्या FMDCP अंतर्गत पाठविलेल्या माहिती पत्रकात सन 2014-15 ची अखर्चित शिल्ल्क रुपये 6,43,060/- नमुद करण्यात आले आहे. परंतु या योजने अंतर्गत आहरित करण्यात आलेल्या देयकात 2015-16 ची रुपये 6,53,560/- निधी नमूद आहे. यावरुन सहआयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांना रुपये 10,500/- कमी रक्कमेचे माहिती सादर करणेबाबत पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद वर्धा चे कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

3) प्रमाणक क्रमांक 2771, दिनांक 31/03/2016 रुपये 1,31,900/- नुसार जय माता ईलेक्ट्रॉनिक्स वर्धा यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या शितकपाट वर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर-1007/प्र.क्र.105/कोषा-प्र.-5, दिनांक 22/02/2008 अन्वये आयकर कलम 194 सी नुसार एकुण रक्कम रुपये 1,31,900/- वर 2 टक्के प्रमाणे रुपये 2,638/- व टॅक्स इनव्हाईस फॉर्म्याटमध्ये उपप्रमाणक नसल्यामुळे 12.5 टक्के दराने VAT रक्कम रुपये 16,488/- असे एकुण रुपये 19,126/- वसुल करुन शासन खाती जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

4) मे. आशीष सर्जीकल दिल्ली डी.एम.क्र.734/टीपीटी, दिनांक 04/03/2016 तसेच जिल्हा परिषद मुद्रणालय वर्धा डी.एम.क्रमांक 2332, दिनांक 31/03/2016 व जय माता इलेक्ट्रॉनीक्स् वर्धा डी.एम.क्रमांक 132, दिनांक 21/03/2016 वर प्राप्तकर्त्याची सही व दिनांक नाही. त्यामुळे साहित्य प्राप्त झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

5) निधी खर्च झाल्याचे उपयोगीता प्रमाणपत्र महालेखापाल यांना सादर केल्याचे व त्यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र निकाली काढल्याचे पत्र प्राप्त करुन घेणेची जबाबदारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांची असतांना तसे पत्र नस्तीत आढळले नाही.

6) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2015/प्र.क्र.28/2015/विनियम, दिनांक 25/06/2015 नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद 3 नुसार साहित्याचे दर बाजारभावाशी पडताळून ते योग्य असल्याचे खरेदी समितीने प्रमाणित करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे खरेदी समितीने कार्यवाही केल्याचे आढळले नाही.

**3.731 पशुवैद्कीय दवाखाने/केंद्रासाठी विदयुत देयके व इतर कार्यालयीन खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 49,645/- खर्च करण्यात आला आहे.

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परीषद, भंडारा येथील 2015-16 चे लेखापरिक्षणात जिल्हा निधी अंतर्गत पशुवैदयकीय दवाखाने/ केंद्राकरीता विदयुत व इतर कार्यालयीन खर्च योजने अंतर्गत वरील साहित्य खरेदी करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-100/कोषा-4, दिनांक 11/02/2000 अन्वये वर्षाचे अखेरीस म्हणजे 15 फेब्रुवारी अथवा तदनंतर कोणत्याही प्रकारची नवीन खरेदी व दुरूस्ती अशा प्रस्तावना मंजुरी देण्यात येवु नये असे निर्देश असतांना जाणीपुर्वक त्याकडे दुर्लक्ष करून नियमबाहयता करण्यात आली आहे. याबाबत शासनाचे क्षमापन घेणे आवश्यक आहे.

2) उपरोक्त खरेदी पशुवैद्यकीय दवाखाने व केंद्रासाठी असतांना वरील साहित्य जिल्हा कार्यालयाकरीता खरेदी केल्याचे व वापरात असल्याचे साठा नोंदवही पान क्र.19 व 20 वर नोंद आहे. दिलेल्या प्रयोजनासाठी निधी खर्च न करता नियमबाह्यता करण्यात आली आहे.

3) पशुवैद्यकीय दवाखाने व केंद्राना साहित्य वाटप केल्याचे पोच पावती तसेच उपयोगीता उपलब्ध नाही.

**3.732 कामधेनु दत्तक ग्राम योजना खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद गोंदिया यांनी सन 2015-2016 या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत कामधेनू दत्तक ग्राम योजना अंतर्गत औषधी खरेदीवर रक्कम रुपये 33,35,926/- खर्च रोखपुस्तकात नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील दत्तक गावांकरीता रुपये 1,52,500/- चे मर्यादीत खर्च करावयाचा असून वरील वितरीत केलेल्या अनुदानातून 1 ते 10 बाबींवर खर्च करावयाचा असून वरील खर्चाबाबत पंचायत समिती स्तरावरुन अभिलेखे उपलब्ध झाले नाही. त्यामुळे खर्चाबाबत खात्री करता आली नाही.

2) कामधेनु योजना अंतर्गत गावाची निवड करतांना पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक 2010/प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 नुसार 1 ते 5 बाबींच्या निकषानुसार गावाची निवड करावी लागते. परंतु निवड केलेल्या गावांची निकषानुसार निवड केल्याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही.

3) पशु वैद्यकीय दवाखान्याची मागणी व शिल्लक साठ्याचा विचार करुन मागणी नोंदविणे आवश्यक होते. परंतु पंचायत समिती व पशुसंवर्धन विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. मागणीचे एकत्रीकरण करुन गोषवारा काढून पुरवठा आदेश देणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) दर करारातील अट क्रमांक 2 नुसार मान्यता प्राप्त प्रयोगशाळेमार्फत गुणवंता तपासणी झाल्याची खात्री करुनच वरील कंपनीस देयके अदा करावयाची होती. असे असतांना गुणवंता तपासणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध नसतांना रक्कमा अदा केल्याचे दिसून आले.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/645/266/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापन करुन फलश्रुती अहवाल सादर केला नाही.

**3.733 75 टक्के अनुदानावर विशेष घटक योजना अंतर्गत अनुसुचित जाती / नवबौध्द जातीच्या लाभार्थ्यांन शेळी गट वाटप करणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,06,94,028/- खर्च करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो/2011/प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 नुसार विदर्भ विभागात स्थानिक जातीच्या शेळ्या व बोकड यांचा गट निश्चित करण्यात आला आहे.

सहा सदस्याने निवड समितीने गटास मंजुरी प्रदान केलेली आहे व प्रतिक्षा यादी मंजुर करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मार्गदर्शक सुचनेनुसार सुधारीत नमुण्यात बंधपत्र न घेणे बाबत :- आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना क्रमांक 6039/6113, दिनांक 19/10/2015 नुसार योजना अमंलबजावणी नंतर अंशत: लाभधारकाकडून पशुधनाचे संगोपन न करता परस्पर विक्री करणे, स्थानांतरण करणे, मालमत्तेचे वापर योग्य प्रकारे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे योजनाचा उद्देश सफल होत नाही. सदर योजना अंतर्गत प्राप्त झालेले पशुधन लाभधारकाने 3 वर्ष योग्य रितीने सांभाळून व्यवसाय करणे बंधनकारक आहे. तसेच अशा घटना घडू नये यासाठी लाभ देतांनाच लाभधारकाने सुधारीत नमुण्यात बंधपत्र घेण्यात यावे. असे आयुक्त यांचे मार्गदर्शक सुचनेत नमुद असतांना लाभार्थीकडून सुधारीत नमुन्यात बंधपत्र घेण्यात आले नाही.

2) पंचायत समिती स्तरावरुन दस्ताऐवज लेखापरीक्षणास न दाखविणे :- मंजुर यादीतील लाभार्थी लाभ घेण्यास तयार नसल्यास प्रतिक्षा यादीतील लाभार्थीस लाभ देतांना मंजुर लाभार्थीकडून नाहरकत प्रमाणपत्र घेऊन नंतर प्रतिक्षा यादीतील लाभार्थीची निवड करावायाची असून पंचायत समिती स्तरावरुन कोणत्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला त्याबाबत पंचायत समिती वरुन दस्ताऐवज तपासण्यात आला नाही. त्यामुळे मंजूर लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

3) शिल्लक अनुदान शासनास परत न करणे :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार अखर्चित अनुदान शासनास परत करणे आवश्यक आहे. परंतु वरील तक्त्यात दर्शविल्यानुसार अखर्चित रक्कम रूपये 5,972/- परत केल्याबाबत चलान नस्तीस आढळून आली नाही. तरी अखर्चित रक्कम शासनास परत करणे बंधनकारक आहे.

4) मास्टर नोंदवही न ठेवणे :- महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास दिनांक 05/10/1989 व दिनांक 02/09/1993 अन्वये गांवनिहाय लाभार्थाची नोंदवही ठेवणे बाबत निर्देश असतांना तशी नोंदवही ठेवण्यात आली नाही.

**3.734 पशुवैदयकीय दवाखान्यासाठी औजारे व हत्यारे पुरवठा करणे यावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 14,99,965/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) साठा पुस्तकात रकाना 01 मध्ये औजारे व हत्यारे प्राप्त दिनांक नमुद नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 91 नुसार साठा पुस्तक दर महिन्याला पूर्ण करणे आवश्यक असून विभाग प्रमुखाने किमान सहा महिन्यातून एकदा शिल्लक साठा पडताळून पाहणे व तसा अभिप्राय त्यात नोंदविणे आवश्यक आहे.

2) रक्कम मिळाल्याबाबत पुरवठादार कंपन्यांकडून मुद्रांकित पोचपावती प्राप्त केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 51(1) नुसार व भारत सरकार राजपत्र दिनांक 10/09/2004 नुसार रक्कम मिळाल्याबाबत संबंधितांकडून मुद्रांकित पोचपावती प्राप्त करणे आवश्यक आहे.

3) मेडीकल इंस्ट्रुमेंट सेल्स ॲण्ड सर्विसेस, पुणे, जायको सर्जिकल उदोग, दिल्ली या दोन कंपन्यांना दिनांक 28/03/2016 रोजी पुरवठा आदेश दिलेला आहे व या कंपन्यांकडून औषधी साठा प्राप्त झालेला असून साठा नोंदवहीमध्ये साठा केव्हा प्राप्त झाला तो दिनांक नमुद नाही. मात्र वाटप दिनांक 03/05/2016 केल्याने साठा उशिरा प्राप्त झाल्याचे नाकारता येत नाही. साठा उशिरा प्राप्त झाला असल्यास दंड वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हत्यारे, अवजारे खरेदी भावबंद दरकरार सन 2014-2016 आदेश क्रमांक व्हीईटी/टेन्डर-326/16/14-16, दिनांक 04/01/2016 नुसार पशुवैद्यकीय दवाखान्यांकडून आवश्यक हत्यारे,अवजारे,उपकरणे यांची मागणी घेणे आवश्यक आहे. संबधित पशुवैद्यकीय दवाखान्याची मागणी नसतांना केलेली खरेदी नियमबाह्य आहे.

5) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हत्यारे, अवजारे खरेदी भावबंद दरकरार सन 2014-2016 आदेश क्रमांक व्हीईटी/टेन्डर-326/16/14-16, दिनांक 04/01/2016 नुसार पुरवठा केलेल्या हत्यारे, अवजारे,उपकरणे यांचे गुणात्मक तपासणी झाल्यानंतर रक्कम अदा करावयाची असतांना तपासणी न करता पुरवठादारास रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

6) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये वित्त विभागाकडुन कोणत्याही प्रकारच्या खरेदीच्या देयकांच्या रक्कमा 15 मार्च नंतर मंजुर करण्यात येणार नसल्याने प्रत्येक खरेदीदार विभागाने आवश्यक त्या वस्तुंची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रृवारी पुर्वीच होईल अशा प्रकारे खरेदी प्रक्रिया राबवायची असतांना सदर साहित्य खरेदी 15 फेब्रृवारी नंतर खरेदी केलेले असल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे.

**3.735 लाळ खुरकत रोगाचे नियंत्रण रोगमुक्त पट्टा निर्माण करणे कार्यक्रमांतर्गत औजारे व हत्यारे खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 11,18,967/- खर्च करण्यात आला आहे. उपआयुक्त, पशुसंवर्धन, (नियोजन व अंदाज), पशुसंवर्धन आयुक्तालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे सन 2014-2015 चे अथसंकल्पीय तरतुद वितरण आदेश क्रमांक 50, दिनांक 20/02/2015 नुसार लाळ खुरकत रोगाचे नियंत्रण रोगमुक्त पट्टा निर्माण करणेसाठी रक्कम रुपये 1,19,000/- व आदेश क्र.28, दिनांक 22/12/2014 नुसार रक्कम रुपये 10,00,000/- ची तरतुद उपलब्ध आहे.

आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हत्यारे, अवजारे खरेदी भावबंद दरकरार सन 2014-2016 आदेश क्रमांक व्हीईटी/टेन्डर-326/16/14-16, दिनांक 14/01/2016 नुसार हत्यारे,अवजारे,उपकरणे पुरवठा भावबंद करार सन 2014-2016 करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) साठा पुस्तक क्रमांक 1/2015-2016 पेज क्रमांक 68, 69 व 70 ते 79 मधिल रकाना 01,02,03 मध्ये औजारे व हत्यारे प्राप्त दिनांक नमुद नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 91 नुसार साठा पुस्तक दर महिन्याला पूर्ण करणे आवश्यक असून विभाग प्रमुखाने किमान सहा महिन्यातून एकदा शिल्लक साठा पडताळून पाहणे व तसा अभिप्राय त्यात नोंदविणे आवश्यक आहे.

2) रक्कम मिळाल्याबाबत पुरवठादार कंपन्यांकडून मुद्रांकित पोचपावती प्राप्त केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 51(1) नुसार व भारत सरकार राजपत्र दिनांक 10/09/2004 नुसार रक्कम मिळाल्याबाबत संबंधितांकडून मुद्रांकित पोचपावती प्राप्त करणे आवश्यक आहे.

3) नॅशनल मेडीटेक,दिल्ली, जायको सर्जिकल उदोग,दिल्ली व रोजी प्लास्टीक, पुणे या तीन कंपन्यांना दिनांक 19/03/2016 रोजी पुरवठा आदेश दिलेला आहे व या कंपन्यांकडून औजारे व हत्यारे साठा प्राप्त झालेला असून साठा नोंदवहीमध्ये साठा केव्हा प्राप्त झाला तो दिनांक नमुद नाही. मात्र वाटप दिनांक केल्याने साठा उशिरा

प्राप्त झाल्याचे नाकारता येत नाही. साठा उशिरा प्राप्त झाला असल्यास दंड वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हत्यारे, अवजारे खरेदी भावबंद दरकरार सन 2014-2016 आदेश क्रमांक व्हीईटी/टेन्डर-326/16/14-16, दिनांक 04/01/2016 नुसार पशुवैद्यकीय दवाखान्यांकडून आवश्यक हत्यारे,अवजारे,उपकरणे यांची मागणी घेणे आवश्यक आहे. संबधित पशुवैद्यकीय दवाखान्याची मागणी नसतांना केलेली खरेदी नियमबाह्य आहे.

5) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हत्यारे, अवजारे खरेदी भावबंद दरकरार सन 2014-2016 आदेश क्रमांक व्हीईटी/टेन्डर-326/16/14-16, दिनांक 04/01/2016 नुसार पुरवठा केलेल्या हत्यारे, अवजारे,उपकरणे यांचे गुणात्मक आणी संख्यात्मक तपासणी झाल्यानंतर रक्कम अदा करावयाची असतांना तपासणी न करता पुरवठादारास रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

6) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये वित्त विभागाकडुन कोणत्याही प्रकारच्या खरेदीच्या देयकांच्या रकमा 15 मार्च नंतर मंजुर करण्यात येणार नसल्याने प्रत्येक खरेदीदार विभागाने आवश्यक त्या वस्तुंची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रृवारी पुर्वीच होईल अशा प्रकारे खरेदी प्रक्रिया राबवायची असतांना सदर साहित्य खरेदी 15 फेब्रृवारी नंतर खरेदी केलेले असल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/645/266/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यांकन करणेबाबत निर्देश असतांना फलश्रृती अहवाल प्राप्त केलेला नाही.

**3.736 ॲस्कॅड योजने अंतर्गत आर्थीकदृष्या महत्वाच्या रोगावार नियंत्रण (HS,BQ,RD) (योजने अंतर्गत सिरींज,निडल्स,स्टरीलायझर,गोब्ज,कॉटन इत्यादी खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,29,994/- खर्च करण्यात आला आहे. उपआयुक्त पशुसंवर्धन, (नियोजन व अंदाज), पशुसंवर्धन आयुक्तालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे सन 2015-2016 चे अथसंकल्पीय तरतुद वितरण आदेश क्र.75 जावक क्रमांक एफवासी-15(16)/सीआर-1216(2)/2016,पसं-6,पुणे-01, दिनांक 22/02/2016 नुसार आर्थिकदृष्टया महत्वाच्या रोगांवर नियंत्रण करणेसाठी रक्कम रुपये 1,30,000/- ची तरतुद उपलब्ध आहे.

आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हत्यारे, अवजारे खरेदी भावबंद दरकरार सन 2014-2016 आदेश क्रमांक व्हीईटी/टेन्डर-326/16/14-16, दिनांक 14/01/2016 नुसार हत्यारे,अवजारे,उपकरणे पुरवठा भावबंद करार सन 2014-2016 करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) साठा पुस्तक क्रमांक 1/2015-2016 पेज क्रमांक 58 ते 62 मधिल रकाना 01,02,03 मध्ये औजारे व हत्यारे प्राप्त दिनांक,परिमाण व मुल्य नमुद नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 91 नुसार साठा पुस्तक दर महिन्याला पूर्ण करणे आवश्यक असून विभाग प्रमुखाने किमान सहा महिन्यातून एकदा शिल्लक साठा पडताळून पाहणे व तसा अभिप्राय त्यात नोंदविणे आवश्यक आहे.

2) रक्कम मिळाल्याबाबत पुरवठादार कंपन्यांकडून मुद्रांकित पोचपावती प्राप्त केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 51(1) नुसार व भारत सरकार राजपत्र दिनांक 10/09/2004 नुसार रक्कम मिळाल्याबाबत संबंधितांकडून मुद्रांकित पोचपावती प्राप्त करणे आवश्यक आहे.

3) नॅशनल मेडीटेक,दिल्ली, या कंपनीस दिनांक 19/03/2016 रोजी पुरवठा आदेश दिलेला आहे व या कंपन्यांकडून साहीत्य प्राप्त झालेला असून साठा नोंदवहीमध्ये साठा केव्हा प्राप्त झाला तो दिनांक नमुद नाही. मात्र वाटप दिनांक 03/05/2017 ला केल्याने साठा उशिरा प्राप्त झाल्याचे नाकारता येत नाही. साठा उशिरा प्राप्त झाला असल्यास दंड वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हत्यारे, अवजारे खरेदी भावबंद दरकरार सन 2014-2016 आदेश क्रमांक व्हीईटी/टेन्डर-326/16/14-16, दिनांक 04/01/2016 नुसार पशुवैद्यकीय दवाखान्यांकडून

आवश्यक हत्यारे, अवजारे, उपकरणे यांची मागणी घेणे आवश्यक आहे. संबधित पशुवैद्यकीय दवाखान्याची मागणी नसतांना केलेली खरेदी नियमबाहृय असुन आहे.

5) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हत्यारे, अवजारे खरेदी भावबंद दरकरार सन 2014-2016 आदेश क्रमांक व्हीईटी/टेन्डर-326/16/14-16, दिनांक 04/01/2016 नुसार पुरवठा केलेल्या हत्यारे, अवजारे, उपकरणे यांचे गुणात्मक आणी संख्यात्मक तपासणी झाल्यानंतर रक्कम अदा करावयाची असतांना तपासणी न करता पुरवठादारास रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

6) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये वित्त विभागाकडुन कोणत्याही प्रकारच्या खरेदीच्या देयकांच्या रक्कमा 15 मार्च नंतर मंजुर करण्यात येणार नसल्याने प्रत्येक खरेदीदार विभागाने आवश्यक त्या वस्तुंची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रृवारी पुर्वीच होईल अशा प्रकारे खरेदी प्रक्रिया राबवायची असतांना सदर साहित्य खरेदी 15 फेब्रृवारी नंतर खरेदी केलेले असल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे.

7) प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी आदेशावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, चंद्रपुर यांची स्वाक्षरी नाही.

**3.737 50 टक्के अनुदानावर तलंग गटाचे वाटपातील गंभीर अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3, 4 व 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,98,000/- + 3,00,000/- + 4,98,000/- = रुपये 9,96,000/- खर्च करण्यात आला आहे. अर्थसंकल्पिय तरतुद वितरण, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परीषद गडचिरोली यांचे पत्र क्रमांक 179, 180, 183/2016 कार्यालय पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली दिनांक 22/02/2016 व 23/02/2016 नुसार सन 2015-2016 साठी आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना, बिगर आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजने अंतर्गत 50 टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना तलंग गटाचे वाटप या बाबीखाली तरतुद वितरण खालीलप्रमाणे पंचायत समितीनिहाय करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची नस्ती तपासली असता योजनेची प्रचार प्रसिध्दी, लाभार्थ्यांचे अर्ज, लाभार्थ्यांची निवड व त्याबाबतची यादी, उपयोगीता प्रमाणपत्र, फलश्रृती अहवाल, मुल्यमापन अहवाल अभिलेख लेखापरीक्षणास सादर केलेला नाही. याबाबत दिनांक 22/11/2016 ला अर्धसमास पत्र क्रमांक 3 अन्वये अभिलेखांची मागणी केली असता अर्धसमासास दिलेल्या उत्तराच्या पत्रामध्ये, "लाभार्थ्यांची यादी प्राप्त न झाल्यामुळे त्या वित्तीय वर्षात तरतुद खर्ची पाडण्याच्या दृष्ट्रीने अनुदान पंचायत समिती स्तरावर वाटप करण्यात आलेले आहे. तसेच पंचायत समिती भामरागड व वडसा यांची लाभार्थी यादी प्राप्त झालेली असुन निवड समितीची मंजुरी घेतलेली नाही. कार्योत्तर मंजुरी घेण्यात येईल व सदर अनियमितता भविष्यात होणार नाही याची काळजी घेण्यात येईल." असे पत्रामध्ये नमुद केलेले आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2010/प.क्र./312/पदुम-4, दिनांक 16/09/2010 मधील मार्गदर्शक सुचना नुसार सदर योजना राबवावयाची असतांना योजनेची व्यापक प्रचार प्रसिध्दी करुन, पंचायत समितीनिहाय अर्ज प्राप्त करुन, जिल्हा निवड समितीव्दारे लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर त्या प्रमाणात संबंधित पंचायत समितीस तरतुद वितरीत करावयाची असतांना त्यानुसार कोणतीही कार्यवाही न करता केवळ अनुदान त्या वित्तीय वर्षात खर्ची पाडण्याच्या दृष्टीने नियमबाहयपणे शासन निर्णयाचे उल्लंघन करुन निधी वाटप करण्यात आलेला आहे. यावरुन योजना राबविलेली नाही असे स्पष्ट होते. सदरबाब गंभिर स्वरुपाची असुन योजना न राबविता नियमबाह्यपणे वितरीत करण्यात आलेला निधी रुपये 9,96,000/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नसुन वसुलपात्र ठरतो.

**3.738 लाळया खुरकत रोगाचे नियंत्रण-रोगमुक्त पटटा निर्माण करणे अंतर्गत साहित्य खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** लाळया खुरकत रोगाचे नियंत्रण-रोगमुक्त पट्टा निर्माण करणे अंतर्गत प्रमाणक क्रमांक 3111, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 4,66,675/- साहीत्य खरेदी करण्यासाठी खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध पुणे यांचे हत्यारे, अवजारे, उपकरणे खरेदी दरकरार सन 2015-2016 पत्र क्रमांक व्हीईटी/टेन्डर/326/16/14-16 पसं-12 औंध,पुणे, दिनांक 04/01/2016 मधिल मार्गदर्शक सुचना नुसार जिल्हा स्तरीय हत्यारे, अवजारे, उपकरणे यांची मागणी करणा-या अधिका-यांनी (जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी/जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त) यांनी हत्यारे, अवजारे, उपकरणे यांची मागणी करण्यापुर्वी त्यांचे अधिनस्त पशुवैदयकीय दवाखान्यांकडुन, प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात गेल्या 3 वर्षात उपचारासाठी आलेल्या पशुरुग्णांचा आजारपणाचा आढावा घेऊन लागणा-या साहीत्याची मागणी करावयाची आहे. मात्र जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी मागणी नसतांना खरेदी केलेल्या साहित्यावरील खर्चाची रक्कम लेखापरीक्षणास मान्य करता येत नसुन वसुलपात्र ठरते.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये वित्त विभागाकडुन कोणत्याही प्रकारच्या खरेदीच्या देयकांच्या रक्कमा 15 मार्च नंतर मंजुर करण्यात येणार नसल्याने प्रत्येक खरेदीदार विभागाने आवश्यक त्या वस्तुंची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रुवारी पुर्वीच होईल अशा प्रकारे खरेदी प्रक्रिया राबवायची असतांना सदर साहित्य खरेदी 15 फेब्रुवारी नंतर खरेदी केलेले असल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे.

3) जिल्हा स्तरावरील साठा नोंदवही तपासली असता नेट प्रोटेक्टर-20 नगांची नोंद घेण्यात आलेली आहे व संबंधीत 12 पंचायत समितींना 12 वाटप दर्शवुन उर्वरीत 8 नग विनावापर पडुन आहेत.

4) जिल्हा स्तरावरील साठा नोंदवहीत वाटप दर्शविलेले कॉम्पुटर साहित्य 1007 HP Cartiage, Pen drive 16 GB पंचायत समिती मुलचेरा, Net Protector, Printer-2900, Hp Cartiage-1020 पंचायत समिती गडचिरोली तसेच पंचायत समिती वडसा यांना Net Protector, Printer-2900, Hp Cartiage-1007, Hp Cartiage-1020 हे साहित्य, संबंधित पंचायत समितीवरील साठा नोंदवही तपासली असता त्यांना प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे मागणी नसतांना खरेदी केलेले व मोघमपणे वाटप दर्शविल्याने यावरील खर्चाची रक्कम वसुलपात्र ठरते.

5) पंचायत समिती मुलचेरा, गडचिरोली, वडसा इत्यादी पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवही लेखापरीक्षणास सादर करण्यात आली. मात्र उर्वरीत पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवही लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नसल्याने त्यांना साहित्य प्राप्त झाल्याबाबत तपासता आले नाही. याबाबत अर्धसमास पत्र 10, दिनांक 29/11/2016 देण्यात आले होते. मात्र मुळ अर्धसमास पत्र उत्तरासहीत परत करण्यात आलेले नाही.

### 3.739 75 टक्के अनुदानावर शेळी गट वाटपातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** अनुदान वितरण जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे अर्थसंकल्पीय तरतुद वितरण आदेश क्रमांक 220/2016, दिनांक 29/02/2016 नुसार सन 2015-2016 साठी योजनांतर्गत योजना अंतर्गत आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेळी गट वाटप या बाबीखाली सन 2015-2016 मध्ये रुपये 24,31,000/- अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) लाभार्थी निवड समिती दिनांक 05/01/2016 नुसार निवड यादीमध्ये पंचायत समिती गडचिरोली अंतर्गत श्री वासुदेव कवडु गेडाम रा. हिरापुर यांचे नाव नसतांना सदस्य सचिव तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे मंजुरी आदेश क्रमांक 216, दिनांक 29/02/2016 मध्ये त्यांचे नांव दर्शविल्याने संबधितास लाभ देण्यात आला. सदर अनियमिततेबाबत संबधितावर जबाबदारी निश्चित करुन रक्कम रुपये 35,750/- वसुल करण्यात यावी.

2) पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, गडचिरोली यांनी मंजुर 2 लाभार्थ्यांना डावलुन तसेच प्रतिक्षा यादीतील अनुक्रमांक 1 ते 4 वर असलेल्या लाभार्थ्यांना डावलुन प्रतिक्षा यादीतील अनुक्रमांक 5 व 6 वर असलेल्या लाभार्थ्यांना नियमबाहयपणे लाभ दिल्याने सदर दिलेल्या खर्चाची रक्कम रुपये 71,500/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, वडसा यांनी मंजुर यादीतील 4 लाभार्थ्यांना डावलुन प्रतिक्षा यादीतील 4 लाभार्थ्यांना नियमबाहयपणे लाभ दिल्याने यावरील खर्चाची रक्कम रुपये 1,43,000/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

4) पंचायत समिती, आरमोरी अंतर्गत एकुण 17 लाभार्थ्यांची निवड करण्यात येऊन त्याप्रमाणात निधी वितरीत करण्यात आलेला असून पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, आरमोरी यांनी 10 लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. उर्वरीत 7 लाभार्थ्यांना लाभ न दिल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच लाभ न दिल्यामुळे शिल्लक निधी परत करणे आवश्यक असतांना सदर शिल्लक रक्कम परत करण्यात आलेली नाही.

5) पंचायत समिती, चामोर्शी अंतर्गत एकुण 20 लाभार्थ्यांची निवड करण्यात येऊन त्याप्रमाणात निधी वितरीत करण्यात आलेला असून पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, चामोर्शी यांनी 18 लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. उर्वरीत 2 लाभार्थ्यांना लाभ न दिल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच लाभ न दिल्यामुळे शिल्लक निधी परत करणे आवश्यक असतांना सदर शिल्लक रक्कम परत करण्यात आलेली नाही. मंजुर लाभार्थीस डावलुन तसेच प्रतिक्षा यादीतील अनुक्रमांक 1 ते 2 वर असलेल्या लाभार्थ्यांना डावलुन प्रतिक्षा यादीतील अनुक्रमांक वर 3 असलेल्या लाभार्थ्यांस लाभ देण्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/645/266/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यांकन करणेबाबत निर्देश असतांना फलश्रृती अहवाल प्राप्त केलेले नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 नुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी वाटप केलेल्या एकुण शेळी गटापैंकी 10 टक्के शेळी गटांची अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 नुसार या योजनेमध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या गटापासुन मिळणा-या उत्पत्राचे अभिलेखे ठेवण्यात यावेत. तसेच सदर योजनेअंतर्गत केलेल्या कार्यवाहीबाबतच्या नोंदी नजीकच्या पशुवैदयकीय संस्थेकडे ठेवण्यात याव्यात. ही माहीती पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेमार्फत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परीषद, गडचिरोली यांनी वरीष्ठ कार्यालयास सादर करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

**3.740 7 टक्के वन महसूल अनुदान अंतर्गत 50 टक्के लाभार्थी हिस्सावर दुधाळ जनावरांचे गट वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सन 2015-16 मध्ये 7 टक्के वन महसूल अंतर्गत 50 टक्के अनुदानावर दूधाळ जनावरांचे गट वाटप करण्याकरीता रक्कम रूपये 35,00,000/- ची तरतुद प्राप्त झालेली असून ते वाटप करणेत आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक जिवाओ 2011/प्र.क्र.305/पशुम-4, दिनांक 22/11/2011 योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनूसार 02 दुधाळ जनावरांचा एक गट (संकरीत गाय/म्हैस रूपये 40000*2 रक्कम रूपये 80,000/- व तीन वर्षाचा विमा रूपये 5,061/-) एकूण किंमत रूपये 85,061/- अनुज्ञेय असून यामध्ये 50 टक्के शासकिय अनुदान रक्कम 42,531/- व 50 टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 42,530/- असे योजनेचे स्वरूप आहे. त्या अनूषंगाने सन 2015-16 मध्ये शासकिय अनुदान 50 रक्कम रूपये 35,00,000/- व 50 टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 35,00,000/- एकूण रूपये 70,00,000/- ची योजना आहे. सदर योजनेस ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 13/01/2013 भाग-2 अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु तसे न करता पशुसंवर्धन विभागाने फक्त शासकिय अनुदान रूपये 35,00,000/- करीताच ठराव क्रमांक 4(2) अन्वये दिनांक 23/09/2015 ला स्थायी समितीची मंजूरी घेतलेली आहे. पूर्ण योजनेची सर्वसाधारण सभेची मंजूरी न घेतल्यामुळे शासन नियमाचे उलंघन झालेले आहे.

2) लाभार्थी निवड समिती सभेचे मूळ कामकाज रजिष्टर सादर केलेले नाही. सभेची प्रत (पत्र) जोडलेली असून त्यावर नियमानूसार एकूण 06 निवड समिती सदस्यांचा स्वाक्ष-या नसून फक्त् अध्यक्ष तथा जिल्हा

पशुसंवर्धन उपायुक्त्, गडचिरोली व सदस्य् सचिव तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांच्याच स्वाक्ष-या आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड पूर्ण समितीने न करता फक्त् 02 सदस्यांच्या मंजूरीने निवड करण्यात आल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे परस्पर लाभ दिल्याचे नाकारता येत नाही. शासन नियमाचे उलंघन झालेले आहे.

3) पंचायत समिती गडचिरोली अंतर्गत A)आनंदराव धोटूजी सिडाम व B) सुरेश विठठल मडावी यांचे नाव निवड किंवा प्रतिक्षा यादित नसल्यावरही यांना योजनेचा लाभ देवून दुधाळ जनावरे वाटप केलेले आहे. सदर बाब नियमबाह्य असून परस्पर लाभ दिल्याचे स्पष्ट होते.

4) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे पत्र क्रमांक जिपगड/पशुसं/लाभार्थी निवड समिती/तां./242, दिनांक 03/03/2016 अन्वये पंचायत समिती सिरोंचा अंतर्गत एकूण 17 लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी श्री. समय्या मदनय्या आलूरी, बोटमपल्ली यांचा अर्ज सादर केलेला नाही. याबाबत दिनांक 30/11/2016 ला अर्धसमासपत्र क्रमांक 12 अन्वये विचारणा केली असता अर्ज सादर केलेला नाही किंवा कोणताही खूलासा पत्रामध्ये नोंदविलेला नाही. त्यामुळे विना अर्ज निवड करून लाभार्थ्याला परस्पर लाभ दिल्याचे स्पष्ट होते.

5) पंचायत समिती धानोरा अंतर्गत निवड यादितील A)गंगाधर भिवाजी लाकूडवाहे व B)मधूकर जंगली दुगा यांना लाभ न देता प्रतिक्षा यादितील लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. पंचायत समिती वडसा अंतर्गत निवड यादितील A) भाउराव नकटू पाटिल व B) देवाजी तुकाराम बावणे यांना लाभ न देता प्रतिक्षा यादितील लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. तसेच पंचायत समिती कूरखेडा अंतर्गत निवड यादितील A)भागीरथ शंकरराव दरवडे B)सनकु निरंगसू मडावी C)करंगसू केवू कवडो व D)निरंगसू केवू कवडो यांना लाभ न देता प्रतिक्षा यादितील लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. वरील निवड यादितील लाभार्थ्यांचे लाभ न घेण्याबाबतचे कारण व त्याबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही.

6) पंचायत समिती मुलचेराला 02 गटाकरीता एकूण शासकिय अनुदान रूपये 85,062/- वितरीत करण्यात आलेले होते. परंतु निवड झालेल्या 02 लाभार्थींनी हिस्सा भरण्यास असमर्थतता दर्शविल्यामुळे व त्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र दिल्याचे पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती मुलचेरा यांनी पत्र क्रमांक पंसमु/पविअ(वि)/तां./111, दिनांक 16/03/2016 लाभार्थी रद्द केल्याचे कळविलेले आहे. परंतु प्रतिक्षा यादि नसल्यामुळे वितरीत केलेले (अखर्चित) अनुदान शासनास परत केलेले नाही.

7) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मार्गदर्शक सूचना क्र. 3 अन्वये लाभार्थी निवडतांना 30 टक्के महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे. परंतु सदर योजनेत कमी महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

8) वाटप केलेल्या दुधाळ जनावराचे प्रत्यक्ष 25 टक्के पडताळणि पशुधन विकास (विस्तार) यांनी व 10 टक्के जनावरांची पडताळणी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी करून तसा अहवाल वरीष्ठ कार्यालयास सादर करणेबाबत सूचना आहे. परंतु त्यानूसार कार्यवाही केल्याचे दस्तऐवजावरून आढळून आले नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/645/266/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापण करून फलश्रुती अहवाल सादर केलेला नाही.

### 3.741 योजनेत्तर योजना सन 2015-2016 मध्ये पशुवैदयकीय संस्थांना यंत्रसामुग्री व साधन सामग्री पुरवठामधील अनियमिततेबाबत

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 59,05,961/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशु दवाखान्यास पुरवठा केलेली औषधी हॉस्पीटल मॅन्युअल खंड 1 चाप्टर 25 परिच्छेद 8 प्रमाणे साठा नोंदवहीत बाबनिहाय औषधांच्या परिभाषा, मुदतबाहय दिंनाक व तपशील नमुद करणे आवश्यक आहे. याबाबत काटेकोरपणा अवलंबिलेला नाही.

2) शासन निर्णय दिनांक 25/11/2008 नुसार प्राप्त् औषधांची गुणात्मक तपासणी आयुक्त, पशुसवंर्धन ,पुणे यांच्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतुन करणे आवश्यक आहे. त्यानंतरच देयकाचे प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु, वरील अनुक्रमांक 1,5,7,8 या औषधींचे गुणवत्ता तपासणी प्रमाणपत्र देयकासोबत दर्शविले नाही.

3) अतिरिक्त आयुक्त्, पशुसवंर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-07 यांचे दरकरार पत्र क्रमांक जा.क्र.डिडिडि/ 326/1199/2014/पस-12, दिनांक 25/11/2014 व वेळोवेळी केलेले दरकरार मजुंरीतील अटी व शर्तीनुसार जिल्हास्तरीय औषधी मागणी करणेपुर्वी त्यांचे अधिनस्त पशुवैदयकीय दवाखान्याकडुन मागणी घेतली असून एकत्रित गोषवारा काढलेला नाही. त्यामुळे मागणीपत्रानुसार खरेदी झालेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समीती लेखा संहिता 1968 मधील नियम 98 व हॉस्पीटल मॅन्युअल खंड -1 परिच्छेद 18 नुसार सक्षम प्राधिका-याने साठा नोंदवहीतील शिल्लक व भांडारातील शिल्लक यांची पडताळणी करुन प्रमाणपत्र देणे व साठयाच्या पडताळणीबाबत अभिप्राय नोंदविणे आवश्यक आहे. यानुसार कार्यवाही केलेली नाही.

5) हॉस्पीटल मॅनुअल खंड -1 मधील परिच्छेद क्रमांक 8 प्रमाणे साठा नोंदवहीत बाबनिहाय औषधांची किमान सुरक्षा पातळी नमुद करणे आवश्यक आहे. याबाबत अतंर्गत सर्व दवाखान्यांना काटेकोरपणे नोंदी होणेबाबत सुचना देण्यात याव्यात.

**3.742 जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत कामधेनु दत्तक ग्राम योजनेतंर्गत पशुवैदयकीय संस्थांना औषधी पुरवठा मधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद बीड चे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणात जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत कामधेनु दत्तक ग्राम योजना राबविण्याकरता 100.00 लक्ष निधी मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामधुन पशुवैदयकीय संस्थाना औषधी पुरवठा, प्रचार व प्रसिध्दीवर 18 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 78,26,951/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक नापुयो-2010/ प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 सर्व कार्यक्रमांच्या टप्पेनिहाय अंमलबजावणीच्या नोंदी ठेवुन कार्यक्रम अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यानंतर योजनेचा प्रगती अहवाल प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांना सादर केले नसल्याचे लेखा परिक्षणात उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन दिसुन आले नाही.

2) कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक नापुयो-2010/ प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 मधील तरतुदीनुसार निवडलेल्या दत्तक ग्राममध्ये विशेष सभा/ ग्रामसभेचे आयोजन करुन स्थानिक पशुपालक / शेतक-यांना योजनेची सविस्तर माहिती देण्यात यावी. याच सभेच्या कार्यक्रमावेळी पशुपालकांना योजनेमध्ये जी शिबीरे / कार्यमोहिमा आयोजित करण्यात येणार आहेत, त्याबाबतचे वेळापत्रक सांगण्यात यावे व ते ग्रामपंचायतच्या सुचना फलकावर लावण्यात यावे. तसेच कार्यवाहीचा टप्पा 1 ते 12 मधील तरतुदीनुसार शिबिरांचे आयोजन प्रत्येक निवड दत्तक ग्राममध्ये पुर्वनियोजीत दिनांकास करण्यात आले असल्याबाबत कोणतीच नोंद कागदपत्रे संचिकेत दिसुन आली नाहीत. सर्व कार्यक्रमाचे आयोजन करतांना शिबीरासाठी असलेल्या प्रचलित शासकीय दराने सेवा शुल्क आकारण्यात यावे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) सदरची योजना सुरु झाल्यापासुन आणि कार्यक्रम नियोजनबध्द पध्दतीने राबविल्यानंतर सहा महिन्यांनी सर्व दुधाळ जनावरांचे दुध उत्पादनाबाबत सर्वेक्षण करुन त्यांच्या नोंदी घेवुन दत्तक गावनिहाय दैनंदिन दुधामध्ये किती वाढ झाली? याबाबतची नोंद संचिकेत दिसुन आली नाही.

4) कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्सवसाय विकास व मत्स्य व्यवसाय, विभाग शासन निर्णय क्रमांक डिआएएस-2009/प्र.क्र.435/पदुम-4, दिनांक 05/03/2010 नुसार औषधी मागणी अधिका-यांनी रूपये 5,000/- किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या खरेदी केलेल्या औषधाची गुणवत्ता अन्न व औषधी प्रशासन विभागाकडील मान्यता प्राप्त प्रयोग शाळेकडुन तपासणी करावी अथवा सदरच्या औषधाच्या बॅच महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाच्या इतर अधिका-यांनी

विहीत पध्दतीने गुणवत्ता तपासणी करुन देयकाची अदायी करणेबाबत आदेश आहेत. परंतु, सदर आदेशाचे पालन केलेबाबत उपलब्ध् केलेल्या अभिलेख्यावरुन तपासणी अहवाल संचिकेत दिसुन आले नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नातुन तसेच शासनाच्या योजना राबविल्या जातात. त्याबाबत वेळापत्रकानुसार कार्यवाही केलेली नाही. कामधेनु दत्तक योजनातंर्गत रूपये 1,00,00,000/- प्रस्तावित असुन त्यामधुन रुपये 36,40,000/- पंचायत समितीस्तरावर वाटप व रुपये 60,10,958/- औषधी खरेदीसाठी तसेच रुपये 2,60,000/- प्रचार व प्रसिध्दी करीता जिल्हा स्तरावर ठेवले आहे. सदर वित्तीय वर्षात औषधी खरेदी दर्शविलेल्या औषध खरेदीपेक्षा कमी केल्याचे दिसुन येते व पंचायत समिती स्तरावर निधी वितरण आदेशाप्रमाणे वितरीत केलेल्या निधीवापराचे विनियोग प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर केले नाही. त्यामुळे त्याच वित्तीय वर्षात योजना राबविल्याचे दिसुन येत नाही.

## 3.743 वैरण विकास व पशुखादय जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत चारा मक्का बियाने (आफ्रिकन स्टॉल) चा पुरवठा करणेबाबत.

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 26,99,970/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2010/प्र.क्र.340/पदुम-4, दिनांक 30/08/2010 वैरण बियाणे पुरवणे योजनेच्या अटी शर्तीनुसार

1. बियाणे पुरवितांना लाभार्थ्यांकडे वैरण उत्पादनास स्वत:ची शेत जमीन व सिंचनाची सुविधा आवश्यक आहे.

2. ज्या लाभार्थ्यांकडे स्वत:ची किमान 3 ते 4 जनावरे आहेत अशा लाभार्थ्यांना प्राधान्य दयावे.

3. प्रति लाभार्थी एक एकरच्या क्षेत्रात वैरण उत्पादन घेण्यासाठी 100 टक्के अनुदानावर रूपये 600/- चे मर्यादेत वैरणीच्या बियाणांचा पुरवठा करावयाचा आहे.

4. वैरण बियाण्याबाबत वाटप करण्यापूर्वी लाभार्थींना वैरण पिकांच्या लागवडीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात यावे. सदर अटी व शर्ती पूर्ण केलबाबतची अभिलेखे संचिकेत उपलब्ध झाली नाहीत.

2) पुरवठा पंचायत समिती स्तरावर केला असून बियाणे शेतकऱ्यांना वाटप केल्याबाबत मागणी अर्ज व मागणी नूसार पुरवठा केल्याबाबत कोणतेही अभिलेखे संचिकेत दिसून आले नाही.

3) शासन निर्णय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग क्रमांक आयएस-2009/प्र.क्र.435/पदुम-4, दिनांक 05/03/2010 अन्वये कार्यप्रणाली विहीत केली आहे. त्यातील सूचना क्रमांक 14 नुसार रुपये 50,000/- वरील खरेदीस तांत्रिक मान्यता प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त याची घेणे आवश्यक असतांना सदर मान्यता संचिकेत आढळून आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) नुसार साहित्य खरेदी झालेनंतर सक्षम प्राधिकाऱ्यांनी गुणवत्ता प्रमाणपत्र दिलेले नाही.

5) सदर बियाणे वाटप केल्यानंतर बियाणे उगवन क्षमता 80 टक्के असून त्याप्रमाणे भुखंडाना भेटी व तपासणी केल्याचे व शेतकऱ्यांना किती फायदा झाला? फलश्रूती अहवाल विभागाने तयार करून सहआयुक्त पशुसंवर्धन यांना पाठविल्याचे संचिकेत आढळून आले नाही.

## 3.744 औषधी खरेदीतील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 8,82,129/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकूण 6 प्रमाणक दिनांक आणि साठा नोंद दिनांक पाहिले असता महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी-1081/सीआर1940/34, दिनांक 14/06/1982 अन्वये साहित्य प्राप्त होण्यापूर्वी वरीलप्रमाणे पूरवठा धारकाचे नावे धनादेश काढण्यात आला आहे.

2) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दिनांक 25/11/2014 दरकरारातील योजनेच्या अटी व शर्ती पुर्ण झाल्याची खात्री विभागाने केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक डीआयएस/2009/प्रस435/पदम-4, दिनांक 05/03/2010 चे परिच्छेद क्रमांक 13 व 18 अन्वये तपासणी करावी. तसेच यंत्रसामुग्री, उपकरणे यांची चाचणी शासकीय प्रयोगशाळा मार्फत करणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे गुणवत्तेबाबत अहवाल घेतलेला नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) अन्वये साहीत्य खरेदी करणेपुर्वी तपासणी केल्याचा अहवाल दर्शविला नाही.

5) पुरवठादाराकडुन प्रत्यक्षात औषधी कधी प्राप्त झाले? याबाबत डिलेव्हरी चालन दर्शविले नाही. दर्शवुन खात्री पटवावी. वाटपावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 21 प्रमाणे प्रदान केलेल्या रक्कमबाबत संबंधीत पुरवठादाराच्या रक्कमा प्राप्त झाल्याच्या पोचपावत्या घेतल्या नाहीत. पोहच दर्शवावे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 91 प्रमाणे कार्यालय प्रमुखांनी साहीत्याची तपासणी करुन साठा व विनियोग बरोबर असल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी-1093/ सीआर/ 1074/ 57, दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा हेतूसफल होत आहे किंवा नाही, याबाबत योग्य ते सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत दिसून आलेला नाही. त्यामुळे उद्देश्य सफल झाल्याचे पडताळणी करता आलेली नाही.

9) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र क्रमांक डीडीडी-360/1211/2013/पसं-12 दिनांक 30/10/2013 मधील F. औषधींचा वापर मधील परिच्छेद क्रमांक 25 नुसार मागणी अधिकाऱ्यांनी / नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांचे अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखाण्यातील औषधींचा उपयोगाची व साठ्याची तपासणी दर 3 महिन्यांनी करणे अनिवार्य असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.745 मल्टीमिडीया प्रोजेक्टर खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,70,325/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद सेस मधून मल्टीमिडीया प्रोजेक्टर खरेदी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1961 चे परिशिष्ठ 1 मध्ये येत नसल्यामुळे खरेदी करता येत नाही. सेस अनुदान रक्कम योजनेवर खर्च करणेबाबत योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे परिशिष्ठ 1 मध्ये विहीत केलेल्या आहेत.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक 10/02/2000 नुसार 15 फेब्रुवारी अथवा त्यानंतर सर्व प्रशासकीय विभाग आणि त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय आणि प्रादेशिक कार्यालयांनी यंत्रसामग्री, उपकरणे, नवीन मोटार वाहने, नवीन फर्निचर, नवीन संगणक, झेरोक्स मशीन अथवा त्यांचे सुटे भाग यांच्या खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी देऊ नये, असे आदेश असतानाही खरेदी करण्यात आली आहे.

3) प्रोजेक्टर प्रत्यक्षात कधी प्राप्त झाले? याबाबत डिलेव्हरी चलान दर्शविले नाही.

4) प्रोजेक्टर खरेदीची नोंद जडसंग्रह नोंदवहीत घेणे आवश्यक असतांना औषधी साठा नोंदवहीत घेण्यात आलेल्या आहेत. जडसंग्रह नोंदवही नमुना नंबर 32 मध्ये नोंदी घेवुन व ते साहित्य सुरक्षीत असल्याबाबतचे प्रमाणपत्रासह अनुपालन दर्शवावे. प्रोजेक्टर वाटपावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे साहित्य खरेदी पुर्वी तपासणी करुन साहित्य योग्य व गुणवत्तापुर्ण असल्याचे प्रमाणित केल्याबाबत दर्शविले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 91 प्रमाणे कार्यालय प्रमुखांनी साहित्याची सहामाही तपासणी करुन साठा व विनियोग बरोबर असल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 21 प्रमाणे उपरोक्त प्रमाणकाबाबत खरेदी साहित्याची रक्कम अदा करतांना संबधीत पुरवठादाराच्या पोचपावत्या घेणे आवश्यक असतांना पोंचपावत्या घेतल्याचे दर्शविले नाही.

**3.746 कालबाह्य मुदतीची तपासणी न करता औषधाची डिलेव्हरी स्विकारल्याबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रूपये 7,13,630/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम पुस्तीका 1965 मधील सेक्शन XXIV अंतर्गत नियम क्रमांक 198 नुसार पुरवठादाराकडुन पुरवठा केलेल्या मालाची गुणात्मक व संख्यात्मक तपासणी केल्यानंतर रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नांदेड यांनी उपरोक्त पुरवठादाराकडुन पुरवठा करण्यात आलेल्या औषधाच्या डिलेवरी चालन तपासणी केली असता असे दिसुन आले की, पुरवठादाराने पुरवठा करण्यात आलेल्या औषधांची मॅन्युफ़ॅक्चरींग डेट व एक्सपायरी डेट याची नोंद डिलेवरी चलन वर नोंदवलेली नाही. यावरुन असे दिसुन येते की, पुरवठादारांनी कालबाह्य झालेल्या औषधाचा पुरवठा केलेला असण्याची शक्यता आहे. संबंधीत पुरवठादाराकडून झालेला औषध पुरवठा कालबाह्य न झाल्याबाबत सत्यता दर्शवुन आक्षेपाचे अनुपालन दर्शवावे.

2) सदर संचिकांची तपासणी केली असता खरेदी समितीची मंजुरी घेतली असल्याचे संचिकेत आढळुन आले नाही.

3) महाराष्ट्र शासन, कृषी व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक 2009/प्र.क्र.435/पदुम-04, दिनांक 05/03/2010 अनुसार रूपये 5,000/- पेक्षा जास्त खरेदी केलेल्या औषधाची गुणवत्ता अहवाल अन्न व औषधी प्रशासन विभागातील मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडुन करणे आवश्यक असताना यानुसार कार्यवाही केलेली नाही.

**3.747 जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत कामधेनू दत्तक ग्राम योजनेतंर्गत पशुवैद्यकीय संस्थांना औषधी पुरवठा मधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात उपरोक्त तपशीलप्रमाणे जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत कामधेनू दत्तक ग्राम योजना राबविण्याकरीता पशुवैद्यकीय संस्थाना औषधी पुरवठा, करण्यासाठी 8 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 63,42,151/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरची योजना सुरु झाल्यापासून आणि कार्यक्रम नियोजनबध्द पध्दतीने राबविल्यानंतर सहा महिन्यांनी सर्व दुधाळ जनावरांचे दूध उत्पादनाबाबत सर्वेक्षण करुन त्यांच्या नोंदी घेऊन दत्तक गावनिहाय दैनंदिन दूधामध्ये किती वाढ झाली? याबाबतची नोंद संचिकेत दिसून आली नाही.

2) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक डिआयएस-2009/प्र.क्र.435/पदुम-4, दिनांक 05/03/2010 औषधी मागणी अधिकाऱ्यांनी रुपये 5,000/- किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या खरेदी केलेल्या औषधांची गुणवत्ता अन्न व औषध प्रशासन विभागाकडील मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडून तपासणी करावी अथवा सदरच्या औषधांची बॅच महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाच्या इतर अधिकाऱ्यांनी विहीत पध्दतीने गुणवत्ता तपासणी करुन देयकाची अदायगी करणेबाबत आदेश आहेत. परंतु, सदर आदेशाचे पालन केलेबाबत उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन तपासणी अहवाल संचिकेत दिसून आले नाही.

3) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन पुरकपत्र क्रमांक नापुयो-2010/ प्र.क्र.50/ पदुम-4, दिनांक 18/04/2013 नुसार ज्या ठिकाणी एका गावात 300 पैदासक्षम गाई म्हशींची संख्या नाही, अशा ठिकाणी लगतच्या गावातील पैदासक्षम गाई-म्हशींची संख्या विचारात घेऊन एकुण 300 पैदासक्षम जनावरांच्या मर्यादेत क्लस्टर स्वरुपात ही योजना राबविण्यात यावी, असे निर्देश असताना उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत संचिकेत तपासणी करताना आढळून आले नाही.

**3.748 जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत कामधेनु दत्तक ग्राम योजना मधून केलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी सन 2015-16 मध्ये निवड महिन्यात वार्षिक योजना अंतर्गत कामधेनु ग्राम दत्तक ग्राम योजना वर 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 10,95,090/- चा खर्च केलेला आहे.

सदर योजनेतून जिल्ह्यातील एकूण 122 पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्य क्षेत्रातील गावातून योजनेच्या निकषांप्रमाणे एक गाव या प्रमाणे 10 गावे दत्तक घेतलेली असून सदर योजना अंतर्गत सर्व उपक्रमावर एका गावासाठी रक्कम रुपये 1,52,500/- एवढा खर्च प्रस्तावित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक नापुयो-2010/प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 अन्वये दत्तक ग्रामाची निवड करून दत्तक गावामध्ये मोहीम स्वरुपात राबविण्यात यावी असे नमूद आहे. सदर शासन निर्णयातील अनु.क्र 1 मधील अट क्र.1 अन्वये दत्तक ग्रामाची निवड हे दुध संकलन केंद्राच्या मार्गावरील असावे असे स्पष्ट नमूद असताना दुध संकलन केंद्र असलेबाबत पुरावे दिसून आले नाही. ज्या बाबत खुलासा करून अनुपालन दर्शवावे.

2) उक्त शासन निर्णयातील अनु.क्र 1 मधील अट क्र 2 अन्वये सदर दत्तक ग्रामा मध्ये पैदास क्षम गाईची /म्हशीची संख्या 300 असावी असे नमूद आहे. परंतु पैदास क्षमता गाईची/म्हशीची 300 संख्या असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही. ज्याबाबत खुलासा करून अनुपालन दर्शवावे.

3) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे औषध पुरवठा भाव बंद दर करार 2014-16 पत्र क्रमांक 15, दिनांक 04/01/2016 मधील सूचना क्रमांक 2 नुसार खात्याचे पत्र क्रमांक डीडीडी/305/334/पसं-12, दिनांक 25/03/2014 च्या पत्रान्वये प्राप्त औषधाची गुणवत्ता तपासणी अहवाल झाल्याची खात्री करूनच दर करारीत कंपनीस देयके अदा करण्यात यावी, असे असताना [1] मे.इंडियन जिनॉमिक्स प्रा.लि.हैद्राबाद यांनी पुरवठा केलेली इंजेक्शन COMAXVET 2GM चा औषध गुणवत्ता तपासणी अहवाल दिनांक 18/04/2016 चा आहे तसेच लिक्विड VITAMIX EF 500 ML चा औषध गुणवत्ता अहवाल संचिकेत दिसून आला नाही [2] मे.अलायन्स बायोटीच हरियाना यांनी पुरवठा केलेली इंजे.IVERMECTINE 50 ML चा औषधी गुणवत्ता तपासणी अहवाल दिनांक 15/04/2016 चा आहे [3] व्हेट इंडिया फार्मास्युटिकल हैद्राबाद यांनी पुरवठा केलेली लिक्विड ZANIDE LDS SUSPENSION 1000 ML [1 लिटर] चा औषधी तपासणी अहवाल दिनांक 18/04/2016 चा आहे सदरील दर करार कंपनी चे औषध गुणवत्ता तपासणी अहवाल माहे एप्रिल 2016 चे असताना पशुसंवर्धन विभागाने तपासणी अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच पुरवठादारांस देयकाची रक्कम अदा केली आहे. यावरून असे दिसून येते कि आयुक्ताचे पत्राचे उल्लघन करून दरकरार कंपनी चे पुरवठादारांला रक्कम अदा केलेली आहे.

4) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे औषध पुरवठा भाव बंद दर करार 2014-16 पत्र क्रमांक 15, दिनांक 04/01/2016 मधील सूचना क्रमांक 2 नुसार खात्याचे पत्र क्रमांक डीडीडी/305/334/पसं-12, दिनांक 25/03/2014 च्या पत्रान्वये प्राप्त औषधाची गुणवत्ता तपासणी अहवाल झाल्याची खात्री करूनच दर करारीत कंपनीस देयके अदा करण्यात यावी, असे असताना [1] मे.इंडियन जिनॉमिक्स प्रा.लि.हैद्राबाद यांनी पुरवठा केलेली लिक्विड VITAMIX EF 500 ML चा औषध गुणवत्ता तपासणी अहवाल नसताना तसेच पुरवठा केलेली लिक्विड VITAMIX EF 500 ML चा औषध मुदतबाह्य कालावधी नमूद केलेला नसताना सदर देयकाची रक्कम कशी अदा करण्यात आली या बाबत खुलासा करावा.

5) मार्गदर्शक सूचना मधील अनु.क्रमांक 2 अन्वये दत्तक ग्राम योजने अंतर्गत निवड केलेल्या गावामध्ये ज्या पशुपालकाकडे जास्त पशुधन घटक संख्या आहे अशा 51 सभासदाची निवड करावी अशा निवडलेल्या सभासदाची बैठक घेवून त्यापैकी 11 सभासदाचे पदाधिकारी मंडळ स्थापन करून स्थापन केलेल्या मंडळास स्थानिक नाव देवून त्याची नोंदणी धर्मादाय आयुक्त यांचेकडे करण्यात यावी अशी कार्यवाही केल्याचे पुरावे लेखापरीक्षणास पहावयास मिळालेले नाहीत. ती दर्शवून सत्यता पटवावी.

6) भारत सरकार, कृषी मंत्रालय, कृषी व सहकार विभाग, नवी दिल्ली यांच्या ऑक्टोबर 1991 च्या पत्रकानुसार आफ्रिकन मका बियाणाची शुद्धता व उगवण क्षमता असावे याबाबत बीज पृथ:करण प्रयोगशाळा यांचेकडील वैरण बियाणे शुद्धता व उगवण क्षमता याबाबतचे परीक्षण अहवाल संचिकेत दिसून आला नाही. तरी परीक्षण अहवाल दर्शवून अनुपालन सादर करावे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 [3] नुसार खरेदीपूर्वी विभाग प्रमुखाने साहित्याची गुणवत्ता व दर्जा बाबत पडताळणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही